सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ०९ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २५५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## व्यावसायिक अभ्यासक्रमांत मुलींच्या प्रवेशसंख्येत वाढ
### मोफत शिक्षण योजनेचा फायदा

पुणे : राज्यातील मुलींना शिक्षणात प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यंदा मोफत शिक्षण योजना लागू केली. त्यानुसार राज्य समाइक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) राबवण्यात आलेल्या यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये मुलींच्या प्रवेशांचा टक्का वाढल्याचे दिसत असून, गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा मुलींचे प्रवेश ४४ हजारांनी वाढले आहेत.

राज्यातील अभियांत्रिकी, विधी, औषधनिर्माणशास्त्र, शिक्षणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट, डिझाइन अशा तंत्रशिक्षणातील व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सीईटी सेलकडून राबवण्यात येते. वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलींना पदवी, पदविका आणि पदव्युत्तर पदवीचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुलींनी प्रवेश घेतला. गेल्यावर्षी राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ४ लाख १४ हजार ७१३ जागांपैकी १ लाख २९ हजार २६३ जागांवर मुलींनी प्रवेश घेतला होता. तर यंदाच्या प्रवेश प्रक्रियेतील ५ लाख ९७ हजार २७७ जागांपैकी १ लाख ७३ हजार ४३४ जागांवर मुलींनी प्रवेश घेतल्याचे सीईटी सेलच्या आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदाच्या प्रवेशांमध्ये ४४ हजार १९८ मुली वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांतील अभियांत्रिकी-तंत्रज्ञान, व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमबीए), विधी, संगणक उपयोजन (एमसीए), वास्तुरचनाशास्त्र, शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी, शिक्षणशास्त्र एकात्मिक अशा अभ्यासक्रमांना विद्यार्थिनींचा प्रतिसाद गेल्यावर्षीच्या तुलनेत वाढल्याचे दिसून येत आहे.

## ईव्हीएमचं रडगाणं सोडून विकासाचं गाणं गा!
### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विरोधकांना प्रत्युत्तर

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या निकालात महायुती सरकारला घवघवीत यश प्राप्त झालं असून मुख्यमंत्री शपथविधी सोहळा देखील पार पडला आहे. सध्या महाराष्ट्रातील आमदारांचा शपथविधी सुरु आहे. मात्र निकाल जाहीर झाल्यापासून अजूनही विरोधकांचे ईव्हीएम मशीनवरुन आरोप-प्रत्यारोप करणं सुरुच आहे. या आरोपांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चांगलेच प्रत्युत्तर दिले आहे.

निवडणुकीत जेव्हा महाविकास आघाडीच्या बाजूने निकाल लागतो तेव्हा ईव्हीएम मशीन चांगल्या असतात. पण जेव्हा निकाल विरोधात लागतो तेव्हा मविआच्या नेत्यांकडून ईव्हीएम घोटाळ्याची ओरड सुरु होते. विरोधी पक्षाकडे आता मुद्दा राहिलेला नाही. जनतेने विरोधकांना त्यांची जागा दाखवली आहे. महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना चारीमुंड्या चित केले आहे. त्यामुळे आता त्यांनी 'ईव्हीएमचे रडगाणे न गाता विकासाचे गाणे गायला पाहिजे', असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

त्याचबरोबर नाना पटोले २०० मतांनी जिंकले, रोहित पवार ११०० मतांनी जिंकले, मग काय म्हणायचं? कोणी काही करु शकतं का? संविधान आहे, लोकशाही आहे. जनमताचे स्वागत केले पाहिजे, असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

## शरद पवारांचा खोटारडेपणा म्हणजे संविधानाचा अपमान : चन्द्रशेखर बावनकुळे

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.८ डिसेंबर : ज्येष्ठ नेते शरद पवार यांना दीर्घ राजकीय अनुभव आहे, परंतु त्यांनी या वयामध्ये अशा प्रकारचा खोटारडेपणा करणे, जनतेला कन्फ्युज करणे अयोग्य आहे. एक प्रकारे ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा अपमान आहे, अशी परखड टिका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. विधान भवन परिसरात माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, विधानसभेमधील त्यांचा मोठा पराभव झाला आहे.जनतेने त्यांना नाकारले म्हणून आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये पराभवाची भीती असल्यामुळे आपले जनमत



वाचवण्याकरिता शरद पवार पुन्हा प्रयत्न करत आहेत आणि मारकडवाडीमध्ये आलेली जी लोक आहेत ती पवार यांची कार्यकर्ते मंडळी आहेत.

महाराष्ट्र या नौटंकीला कंटाळलेला आहे. महाराष्ट्र हा विकासाच्या बाजूने आहे. महाराष्ट्राला महायुतीकडून अपेक्षा आहे आणि महायुतीचे सरकार देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये महाराष्ट्र प्रचंड ताकदवान बनणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ईव्हीएम विजेते राजीनामे द्या

माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी बॅलेट पेपरवर निवडणुका घेणार असल्यास राजीनामा देण्याची तयारी दाखवली आहे.त्याबाबत बावनकुळे म्हणाले की,असे असेल तर मग महाविकास आघाडीचे जे जे लोक ईव्हीएम मशीनवर निवडून आले आहेत त्या सर्वांनी राजीनामा दिले पाहिजे.खोटारडेपणा करण्यासाठी असा उद्योग सुरू केला आहे . लोकसभेला आम्हाला मोठ्या प्रमाणात अपयश मिळालेलं तर आम्ही ईव्हीएमला दोष दिले नाही तर आम्ही आमच्या चुका दुरुस्त केल्या.लोकसभेच्या पराभवातून आम्ही शिकलो आणि त्यातून आम्ही पुढे गेलो

## बेळगावातील एकीकरण समितीचा महामेळाव्यात महाराष्ट्रातील नेत्यांना बंदी!

कोल्हापूर : उद्यापासून कर्नाटक सरकारचे हिवाळी अधिवेशन बेळगाव येथे सुरू होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र एकीकरण समितीने मराठी भाषिकांच्या महामेळाव्याचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीकडून सीमा भागातील मराठी भाषिकांच्या समर्थनासाठी या मेळाव्याला यावे, असे आवाहनकरण्यात आले आहे. मात्र, कर्नाटक सरकारने या महामेळाव्यावर बंदी घातली आहे. तसेच महाराष्ट्रातल्या नेत्यांना कर्नाटकात येण्यास बंदी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २००६ पासून सुरु असणाऱ्या मराठी भाषिक मेळाव्याचे यंदाही आयोजन करण्यात आले आहे. मात्र नेहमीप्रमाणे यावेळीही कर्नाटक सरकारची मराठी भाषिकांवर दडपशाही सुरु असल्याचे दिसून येत आहे. मेळाव्याच्या कालावधीतच कर्नाटक सरकारने बेळगावात विधिमंडळ अधिवेशन भरवले आहे. त्यामुळे प्रशासनाकडून कायदा-सुव्यवस्थेचे कारण पुढे करत स्थानिक प्रशासनाची मराठी भाषिकांच्या महामेळाव्याला परवानगी नाकारली आहे. तसेच महाराष्ट्रातील नेत्यांना देखील बेळगावात प्रवेशबंदी घातली आहे. 'कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रातील नेत्यांनी बेळगाव जिल्ह्यात प्रवेश करू नये, अन्यथा त्यांना महाराष्ट्राच्या सीमेवरच रोखले जाईल', असा इशारा कर्नाटक सरकारकडून देण्यात आला आहे.

शिवसैनिकांचे सडेतोड उत्तर

कोल्हापूरातील शिवसैनिकांनी कोणत्याही परिस्थितीत बेळगावात जाण्याचा निर्धार केला आहे. आम्हाला बेळगावमध्ये प्रवेश मिळाला नाही तर आम्हीदेखील कर्नाटकमधील नेत्यांना कोल्हापूरमध्ये अंबाबाईच्या दर्शनाला येऊ देणार नाही, अशी भूमिका या शिवसैनिकांनी घेतली आहे. त्यामुळे सोमवारी बेळगावात काय घडणार, हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

## दुसऱ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाकडून भारताचा लाजिरवाणा पराभव




मुंबई: बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या दुसऱ्या कसोटीत टीम इंडियाला १० विकेटनी पराभव सहन करावा लागला. पर्थमध्ये जबरदस्त कामगिरी करणाऱ्या टीम इंडियाचे शेर मात्र अॅडलेडमध्ये ढेर झाले. हा कसोटी सामना पिंक बॉलने खेळवण्यात आले. पिंक बॉलसमोर भारतीय फलंदाजांनी गुडघे टेकले. या विजयासह ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे.

या मालिकेतील पहिला कसोटी सामना पर्थमध्ये खेळवण्यात आला होता. या सामन्यात भारताने २९५ धावांनी विजय मिळवला होता. पर्थमध्ये गोलंदाजांसह फलंदाजांनीही विजयात मोलाचे योगदान दिले होते. यशस्वी जायसवाल आणि विराट कोहलीने शतके ठोकली होती. तर जसप्रीत बुमराहने ८ विकेट मिळवल्या होत्या. अशातच पर्थमध्ये जबरदस्त कामगिरी करणारे हे हिरो अॅडलेडच्या मैदानावर मात्र हतबल दिसले.

## पुणे रेल्वे स्टेशनवर बॉम्ब ठेवल्याचा फोन; पोलीस अलर्ट मोडवर!

पुणे : पुणे रेल्वे स्टेशनवरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर बॉम्ब ठेवला असल्याचा फोन पुणे पोलीस नियंत्रण कक्षाला करण्यात आला होता. सकाळी ९ वाजता अज्ञात व्यक्तीकडून फोन आल्याची माहिती समोर आली आहे. फोन करणाऱ्या व्यक्तीचे वय ४० असून तो पिंपरी - चिंचवड भागातील रावेत येथील राहणारा असून त्याला पिंपरी चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे शहर पोलीस नियंत्रण कक्षाला सकाळी ९ वाजता अज्ञात व्यक्तीने फोन केला. पुणे रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर बॉम्ब ठेवल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी तातडीने प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर तपासणी केली. मात्र त्याठिकाणी तसे काही आढळून आले नाही. फोन करणाऱ्या व्यक्तीची माहिती काढल्यावर तो पिंपरी - चिंचवड भागातील रावेत येथील राहणारा असल्याचे समजले. त्याला तातडीने पिंपरी चिंचवड पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले आहे. त्याने नशा करून खोडसाळपणे फोन केल्याची माहिती समोर आली आहे. पिंपरी - चिंचवड पोलिसांकडून सदरील व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.



## 'स्वास्थ्यम' या जागतिक आरोग्य महोत्सवाच्या तिसऱ्या आवृत्तीचे आयोजन

पुणे : पुणे ६ ते ८ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या 'स्वस्थ्यम: द ग्लोबल फेस्टिव्हल ऑफ वेलनेस' च्या तिसऱ्या आवृत्तीत अध्यात्म, सजगता आणि सर्वांगीण आरोग्य यांचा संगम पाहत आहे. या महोत्सवाने विचारवंत नेत्यांना एकत्र आणले आहे. आध्यात्मिक मार्गदर्शक, आरोग्य शिक्षक आणि वेलनेस प्रॅक्टिशनर्स समकालीन जीवनातील सजगतेच्या परिवर्तनीय शक्तीचा शोध घेण्यासाठी आणि आंतरिक कल्याणाचा मार्ग प्रकाशित करा. तीन दिवसीय कार्यक्रम, भारतातील सर्वात मोठा वेलनेस फेस्टिव्हल, सहभागींना लाइव्ह सत्रे, कार्यशाळा आणि माइंडफुलनेस आणि योगापासून मानसिक आरोग्य आणि सर्वांगीण आरोग्य पद्धतींपर्यंतच्या थीमवर चर्चा करण्याची संधी देते. भारताच्या प्राचीन परंपरेत रुजलेला, हा सण आजच्या वेगवान जगात या प्रथांची शाश्वत प्रासंगिकता अधोरेखित करतो. विशेषत: कोविड-१९ साथीच्या आजारापासून, लोकांच्या वाढत्या संख्येने लोकांच्या आरोग्यासाठी आणि आंतरिक आत्मसंवर्धनासाठी सक्रियपणे उपाय शोधत असताना, निरोगीपणा लोकांच्या जीवनात समोर आला आहे. आरोग्यम विविध प्रकारच्या परिवर्तनीय अनुभवांची ऑफर देऊन सर्वांगीण कल्याणाचे महत्त्व वाढवत आहे. कार्यक्रमात बोलताना प्रेरक वक्त्या आणि अध्यात्मिक नेत्या जया किशोरी यांनी इच्छास्वातंत्र्य आणि आत्म-साक्षात्काराचे महत्त्व सांगितले.

## लाडकी बहीण योजनेत नोंदणीसाठी एक संधी मिळावी-शंकर देशमुख

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे मागणी



बीड दि.०८ डिसेंबर (प्रतिनिधी) मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेत वंचित माता भगिनीना नोंदणी साठी एक संधी मिळावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केली आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात मागणी करताना देशमुख यांनी म्हटले आहे या योजनेमुळे अनेक गरजू महिलांना दैनिक खर्चासाठी आधार झाला आहे परंतु मागील सरकारच्या काळात नोंदणी साठी मुदत व मुदत वाढवून दिली होती तरी ही या कालावधीत देखील काही गरवंत महिला या योजनेत नोंदणी करु शकल्या नाहीत ज्यात कागदपत्रे,प न चालने ,नेटवर्क रेज नसने व काही स्थलांतरित अशा विविध कारणांमुळे यामघुन वंचित राहिल्याने त्या नोंदणी करु शकल्या नव्हत्या त्या माताभगिणी नोंदणीसाठी एक संधी मिळावी अशी मागणी करत आहेत आणि म्हणून मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेत नोंदणी करण्यासाठी एक १५ दिवसांची संधी उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी शंकर देशमुख यांनी केली व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करुन १५०० रु २१०० लाडकी बहिण योजनेतील अनुदानात वाढ करणार असल्याच्या घोषणेचे अभिनंदन निवेदनाद्वारे केले आहे

## सामाजिक न्याय विभागाच्या योजनांबाबत महाविद्यालयाच्या प्राचार्यासोबत बैठक संपन्न

**नांदेड,दि. ०७ डिसेंबर** : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत समाज कल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना, व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणा-या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता तसेच राजर्षी शाहू महाराज गुणवता शिष्यवृत्ती तसेच स्वाधार योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासनमान्य अनुदानित/ विनाअनुदानीत/कायमविना अनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्याशी आढावा बैठक नुकतीच समाजकल्याण नांदेड येथे संपन्न झाली. या बैठकीसाठी जिल्ह्यातील महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते. या बैठकीत भारत सरकार शिष्यवृती योजनेचे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयस्तरावरील प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढणे, स्वाधार योजनेच्या ग्रामिण विद्यार्थ्यांची उपस्थिती तपासून सादर करणे, महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर योजनाबाबत नोटीस लावणे, भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचे अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल तात्काळ सादर करणे, तसेच राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृती योजनेचे अर्ज तात्काळ निकाली काढणे. तसेच भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त घर घर संविधान कार्यक्रम साजरा करणे याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

## विश्वंभर निकम यांचे निधन



वाळूज महानगर : विश्र्वंभर महादू निकम (६८, रा. पिशोर, ह.मु. सावधान हौसिंग सोसायटी, एन-८ सिडको) यांचे रविवारी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास हृदयविकारच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा आणि जावई असा परिवार आहे. शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या निकम यांचा दांडगा मित्र परिवार होता. त्यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी सिडको एन-६ येथील स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

# वर्णी महापूजेने श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष महोत्सावास प्रारंभ

## यंदाही मंदिरात आराध्य बसण्यासाठी मंदिर प्रशासनाची तगडी तयारी

अंबाजोगाई : महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान व अंबाजोगाईचे ग्रामदैवत असलेल्या श्री योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत साजरा होत आहे. रविवारी सकाळी वर्णी महापूजेने मार्गशीर्ष महोत्सवास प्रारंभ झाला. तहसीलदार विलास तरंगे व सौ मयुरी तरंगे यांनी योगेश्वरी देवीची विधीवत महापूजा केली. या वर्णी महापूजेने या महोत्सवास प्रारंभ झाला.

मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदीर परिसरात सलग नऊ दिवस आराध्य बसण्याची परंपरा गेल्या अनेक शतकांपासून सुरू आहे. या वर्षी देखील मंदिरात जवळपास ४ ते ५ हजार महिला आराध्य बसणार असल्याची माहिती देवल कमिटीच्या वतीने देण्यात आली. रविवारी सकाळी झालेल्या महापूजेनंतर महिलांची मंदिरात आराध्य बसण्यासाठी गर्दी वाढू लागली होती. शहर वासियांनी योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा केल्या होत्या. या वेळी झालेल्या महापूजेला तहसीलदार तथा देवल कमिटी चे अध्यक्ष विलास तरंगे,व सौ. मयुरी तरंगे यांनी विधिवत योगेश्वरी देवीची महापूजा व महाआरती केली. यावेळी देवल कमिटीचे सचिव प्रा.अशोक लोमटे, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, विश्वस्त संजय भोसले,डॉ.संध्या जाधव,अमोल लोमटे,सतीश लोमटे, प्रवीण दामा,हंसराज देशमुख,राजपाल भोसले, देवीचे पुजारी सारंग पुजारी, योगेश्वरी देवीचे पुरोहित,मानकरी व भक्त उपस्थित होते. यावेळी पुरोहितांच्या मंत्रोच्चारात व विधीवत महापूजेनंतर महाआरती झाली. महोत्सवाच्या कालावधीत सलग नऊ दिवस विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन देवल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच आराध्य बसलेल्या सर्व महिलांच्या निवासाची, पाण्याची व त्यांना मूलभूत गरजा पुरवण्यासाठी देवल कमिटीच्या वतीने उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. मंदिरात बसणाऱ्या सर्व आराध मंडळाच्या सकाळच्या नाश्ता ( फराळ), दुपारचे जेवण त्याचबरोबर संध्याकाळी फराळ अशी भोजनाची व्यवस्था देखील मंदिर प्रशासनाकडून केली गेली असल्याची माहिती योगेश्वरी देवल कमिटीचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे,सचिव प्रा. अशोक लोमटे यांनी दिली. या वर्षी मंदिरात बसणाऱ्या प्रत्येकाची नावनोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्यात येणार आहे जेणेकरून मंदिर परिसरात किती आराध्य बसले आहेत याची माहिती मंदिर प्रशासनाकडे राहून त्यांची संपूर्ण व्यवस्था मंदिर प्रशासनाकडून केली जाईल असेही अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे तथा सचिव प्रा अशोक लोमटे यांनी याप्रसंगी सांगितले आहे.

# आमदार श्रीजया चव्हाणांना नामदार करा..!

## भाजप अनु. जाती मोर्चाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,दि. ०८ डिसेंबर**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या भोकर विधानसभा मतदार संघात भारतीय जनता पार्टी महायुतीच्या उमेदवार ड. श्रीजया अशोकराव चव्हाण पन्नास हजाराचे मताधिक्य घेवून आमदार झाल्या. आता या युवा आमदाराला पक्षश्रेष्ठीने नामदार करून नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी द्यावी. अशी विनंती करणारे पत्र महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी अनुसुचित जाती मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना देण्यात आले आहे.

भारतीय जनता पार्टी अनुसुचित जाती मोर्चाचे प्रदेश सचिव रामराव भालेराव आणि जिल्हाध्यक्ष विलास साबळे यांनी दि. ७ डिसेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना ई-मेलद्वारे लेखी पत्र देवून भोकर विधानसभेच्या आमदार अॅड. श्रीजया चव्हाण यांचा मंत्री मंडळात समावेश करून त्यांना नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी द्यावी. अशी आग्रहाची मागणी केली आहे. ८५ - भोकर विधानसभा मतदार संघात मागील अनेक वर्षांपासून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचे वर्चस्व राहिले आहे. याच मतदार संघातून स्वर्गीय डॉ. शंकरराव चव्हाण साहेब हे राज्याचे मुख्यमंत्री झाले होते. त्यानंतर त्यांचे सुपूत्र अशोकराव चव्हाण हे सुध्दा दोनवेळा राज्याचे मुख्यमंत्री झाले. मागील विधानसभा निवडणुकीत याच मतदार संघातून अॅड. श्रीजयाताई अशोकराव चव्हाण भारतीय जनता पार्टीची उमेदवारी घेवून पन्नास हजाराच्या मताधिक्यांनी विजयी झाल्या आहेत.

भोकर मतदारसंघात आजपर्यंत अशोकराव चव्हाण यांच्याच नेतृत्वावर विश्वास ठेवून येथील जनता चव्हाण परिवारांच्या सोबत खंबीरपणे उभी राहीली आहे. मात्र अशोकराव चव्हाणांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर पहिल्याच निवडणुकीत आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या रूपाने भोकर मतदारसंघात पहिल्यांदाच भाजपचे कमळ फुलले आहे. शिवाय त्या उच्च विद्याविभूषित असून त्यांचे आजोबा, आई, वडील यांनी आजपर्यंत सर्व जाती-धर्मासह सर्वसामान्यांना सोबत घेऊन सकारात्मक राजकारण केले आहे. त्यामुळे चव्हाण कुटुंबीयांची आपुलकी आणि लोकप्रियता समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोंहचली आहे. भविष्यात याचा फायदा भारतीय जनता पार्टीच्या सकारात्मक राजकारणासाठी होणार असून भाजपचे संघटन वाढुन भाजपला मोठी बळकटी येणार आहे. त्यासाठी पक्षश्रेष्ठींनी युवा आमदार अॅड. श्रीजयाताई चव्हाण यांना ताकद देणे गरजेचे आहे. असे निवेदनात नमूद करून भोकर विधानसभेच्या आमदार अॅड. श्रीजयाताई चव्हाण यांना मंत्रीपद देवून नांदेड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी द्यावी. अशी मागणी भाजप अनुसुचित जाती मोर्चाचे प्रदेश सचिव रामराव भालेराव आणि भाजप अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष विलास साबळे यांनी केली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण भारतीयांचे प्रेरणास्थान : डॉ. राम वाघमारे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही एका जाती, धर्म किंवा पंथाचे नव्हते तर ते संपूर्ण भारतीयांचे होते, असे मत प्रसिद्ध साहित्यिक डॉ. राम वाघमारे यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महात्मा फुले हायस्कुल बाबा नगर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ. कोलेवाड होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक अरुण कल्याणकर उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले, बाबासाहेब हे फक्त बहुजन समाजाचे नव्हे, तर शेतकरी, स्त्रिया, कामगार आणि समाजातील प्रत्येक वंचित घटकासाठी कार्यरत होते. त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांचे शेतकरी धोरण, जलनीती, कामगारांचे अधिकार, स्त्री सक्षमीकरण आणि समता प्रस्थापनेसाठी त्यांनी केलेले कार्य हे भारतासाठी अभूतपूर्व आहे, असेही ते म्हणाले.

डॉ. वाघमारे यांनी बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरणाचा विचार, समता प्रस्थापनेसाठी त्यांनी घेतलेली भूमिका व समाजातील वंचित घटकांसाठी केलेले क्रांतिकारक कार्य उपस्थितांसमोर सादर केले. यावेळी पर्यवेक्षक अरुण कल्याणकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन साईनाथ कांडले यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एक जेसीबीसह दोन हायवा जप्त; ग्रामीण पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**



ग्रामीण पोलिसांनी शनिवारी रात्री अवैध रेती वाहतुकी विरोधात कारवाई करून रेती उपसासाठी वापरण्यात येणारे जेसीबी वाहतुकीसाठी वापरण्यात दोन हायवा जप्त केले आहेत.

विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी अवैध धंदे रोकण्याच्या कडक सुचना दिलेल्या असून त्या सुचने नुसार नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे पथक मागील काही दिवसापासून अवैध रेती वाहतुकीवर जोरदार कारवाई करत असून नुकतेच त्यांनी अवैधरीतीविरुद्ध विरोधात कारवाई केली होती. पुन्हा शनिवारी रात्री त्यांच्या पथकाने रेती वाहतूक करणाऱ्या दोन हायवा व एक जेसीबी असा एकूण १ कोटी १५ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी गजानन मुरलीधर कदम रा. शेलगाव, त्र्यंबक पाटील रा. बोरगाव, कृष्णा वानखेडे रा. बेटसांगावी यांना अटक केली आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं.५५०/२०२४
पु.ता. २०/०१/२०२५

अर्जदार : १. सुमनबाई काशिनाथ नाईक, तयं. ६६ वर्ष धंदा. शेती २. बापू काशिनाथ नाईक, वय ४६ वर्ग धंदा. शेती ३.गोविंद काशिनाथ नाईक, वय. ४१ वर्ष धंदा. शेती ४. किसन काशिनाथ नाईक, वय. ३७ वर्ष धंदा. शेती सर्व रा. फतियाबाद, ता.गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्ध :-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन अॅक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार नं. १ याचे पति व २ ते ४ यांची वडिल नामे काशिनाथ भिमराव नाईक हे दि. ११/०८/२०२३ रोजी मेडिकव्हर हॉस्पीटल, छ.संभाजीनगर ता.जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत काशिनाथ भिमराव नाईक यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत काशिनाथ भिमराव नाईक यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत काशिनाथ भिमराव नाईक यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्टीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत काशिनाथ भिमराव नाईक यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहा. अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

### जाहिर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : ०३/०२/२०२५
दि.कि.अर्ज क्र. ३८६/२०२४

अर्जदार : १. रोहीदास हिरा जाधव, वयः २३ वर्षे, धंदाः शेती, रा. उम्बरखेडा, ह.मु. हिवरखेडा गौ., ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. सगुना आधार चव्हाण, वयः २० वर्षे, धंदाः घरकाम, रा. हिवरखेडा गौ.. ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील अॅड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील नामे हिरा सिताराम जाधव हे दि. २९/०४/२००७ रोजी मौजे हिवरखेडा गौ., ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत हिरा सिताराम जाधव यांना अर्जदार क्र. १ ते २ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०७/१२/२०२४

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. बी. इंगोले, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ५५४/२०२४
प्रकरणात पुढील तारीख २२/०१/२०२५

अर्जदार -१) शकुंतला भ्र. अरूण सातदिवे वय ६२ वर्षे, धंदा घरकाम रा. हरसुळ, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद. २) सुशिला भ्र. अशोक पगारे वय ४४ वर्षे, धंदा घरकाम रा. गावठाण, लोहगांव, प्रवरानगर, ता. राहता जि. अहमदनगर. ३) सिध्दार्थ पिता अरूण सातदिवे वय ४२ वर्षे, धंदा मजूरी रा. हरसूळ, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद. ४) वैशाली भ्र. भिमराज वाघ वय ३९ वर्षे, धंदा घरकाम रा. प्लॉट नं. ८९, जालना नगर, पैठण रोड, औरंगाबाद. ५) निलेश पिता अरूण सातदिवे वय ३६ वर्षे, धंदा मजूरी रा. हरसूळ, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात अॅड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ ते ५ यांचे वडील नामे अरूण रघुनाथ सातदिवे हे दिनांक १५/०८/२०२४ रोजी मौजे शक्करभाई मोहल्ला, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ची सासू व अर्जदार क्रं. २ ते ५ यांची आजी नामे मंडाबाई रघुनाथ सातदिवे हे दिनांक ३०/०१/१९९५ रोजी मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासरे व अर्जदार २ ते ५ यांचे आजोबा नामे रघुनाथ सातदिवे हे सुध्दा बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले असून मयत अरूण रघुनाथ सातदिवे यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ४ ह्या मुली असून अर्जदार क्रं. ३ व ५ हे मुले या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत अरूण रघुनाथ सातदिवे यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक ०७/१२/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्हि.एन. काटकर दूसरे सह दिवाणी न्यायाधिश क, स्तर कत्रड, न्यायालय क्र.३ जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्र. २९३/२०२४.

अर्जदार : १) रुबाबबी भ्र. रशिद शेख वयः-६५ वर्षे, धंदाः घरकाम रा. हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद, २ युसुफ पि. शे. रशिद वय: ४४ वर्षे, धंदाः मजुरी रा. हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३ रफिक पि.शे. रशिद वयः ४२ वर्षे, धंदाः व्यापार रा. हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४ परविन भ्र. शे. नसिर वय-४० वर्षे, धंदा घरकाम रा. हतनूर ता. कब्रड जि. औरंगाबाद,

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद,

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन VIII 1827 चे कलम २ व ३ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरिल अर्जदार १ रुबाबबी प्र. रशिद शेख रा. हतनुर ता. कन्नड जि. औरंगाबाद. २ युसुफ पि. शे. रशिद रा. सदर ३ रफिक पि.शे. रशिद रा. सदर ४) परविन प्र. शे. नसिर रा. सदर यांनी मा. न्यायालयात त्याचे वकिल श्री.बि. जे. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडिल नामे रशिद पि. शे. गुलाब हे होते ते दि. ३०/६/२०१८ रोजी मौजे हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे मयत झाले आहेत. मयत रशिद पि. शे. गुलाब यांचे वडिल नामे गुलाब महंम्मद शेख हे होते दि. १/११/१९६५ रोजी मौजे तुर्काबाद ता. गंगापुर येथे मयत झालेले आहेत. मयत गुलाब महंम्मद शेख यांना अर्जदार क्र.। ते ४ हेच कायदेशिर वारस आहेत मयत श्री. मयत गुलाब महंम्मद शेख यांचे नावे असलेल्या मिळकति या अर्जदार क्र.। ते ४ चे नावे नामनिर्देशित करणे आहे. तसेच अर्जदार यांना ईतर शासकिय कामाकरिता देखिल मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सदर मिळकती महसुल कार्यालयातुन अर्जदारांचे नावे नामनिर्देशित करणे कामी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयतास अर्जदार क्र. १ ते ४ शिवाय इतर कोणीही कायदेशिर वारस नाही. अर्जदाराने सदरचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात सादर केला आहे. याबाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आल्यास त्यंनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात लेखी स्वरुपाने स्वता अथवा आपल्या विधिज्ञां मार्फत उजर सादर करावा. मुदतित उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारित करण्यात येतिल.

दि. १९/११/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

जा.क्र. जे-१/नोटीस / ५६६४/२०२४.
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छ. संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर.
दिनांक : २५/११/२०२४

### चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.**

**अर्ज क्रमांक :- ०५/२०२४कलम ५० अ-(२)**

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक : उन्नती शिक्षण संस्था, प्लॉट नं. ४१ मुकुंद को-ऑपरेटिव्ह हॉसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर नॉ.क्र. एफ-११७४ (औ).

अर्जदार : १. उन्नती शिक्षण संस्था एफ-११७४ प्लॉट नं. ४१ मुकुंद को-ऑपरेटीव्ह हॉउसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर श्री. शैलेंद्र भिमसेन विटोरे रा-प्लॉट नं. ४१ को-ऑपरेटिव्ह हॉउसिंग सोसायटी, सिडको एन-२ छ. संभाजीनगर व इतर सहा. २. आश्विनी बहुउददेशीय शैक्षणिक सेवाभावी प्रतिष्ठाण ई-८६५ प्लॉट नं. ४१ मुकुंद को-ऑपरेटीव्ह हॉउसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर श्री. शैलेंद्र भिमसेन विटोरे रा-प्लॉट नं. ४१ को- ऑपरेटिव्ह हॉउसिंग सोसायटी, सिडको एन-२ छ. संभाजीनगर व इतर चार.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

सर्व संबंधीत लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहु प्रकरणात अर्जदार व इतर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०-अ (२) अन्वये आश्विनी बहुउददेशीय शैक्षणिक सेवाभावी प्रतिष्ठाण ई-८६५ प्लॉट नं.४१ मुकुंद कोऑपरेटीव्ह हॉउसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर ही संस्था न्यासाच्या सर्व जंगम मालमत्तेसह, तसेच न्यासामार्फत चालविण्यात येत असलेले शाळा हेरंब प्राथमिक विदया मंदिर इंग्रजी/मराठी माध्यम सिडको एन-२ या शाळेच्या मान्यतेसह उन्नती शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर एफ-११७४ प्लॉट नं.४१ मुकुंद कोऑपरेटीव्ह हॉउसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर या संस्थेमध्ये / सार्वजनिक न्यासामध्ये विलीनीकरण करण्याचे दोन्ही संस्थेचे कार्यकारी मंडळांनी पारीत केलेल्या ठरावानुसार, या संस्थेच्या विलीनीकरणानंतर आश्विनी बहुउददेशीय शैक्षणिक सेवाभावी प्रतिष्ठाण ई-८६५- प्लॉट नं.४१ मुकुंद कोऑपरेटीव्ह हॉउसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर ही संस्था उन्नती शिक्षण संस्था एफ-११७४ प्लॉट नं.४१ मुकुंद कोऑपरेटीवा हॉउसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर या नावाने ओळखली जाईल. सदरचा सामायीक योजना करणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे. व त्याबाबत मा. धर्मादाय उप आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचे समोर चौकशी चालु आहे.

संस्थेचे नाव व पत्ता व नोंदणी क्रमांक

१. उन्नती शिक्षण संस्था एफ-११७४ प्लॉट नं.४१ मुकुंद कोऑपरेटीव्ह हॉउसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर,
२. आश्विनी बहुउददेशीय शैक्षणिक सेवाभावी प्रतिष्ठाण ई-८६५ प्लॉट नं. ४१ मुकुंद कोऑपरेटीव्ह हॉउसिंग सोसायटी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर,

वरील न्यासाचे खालीलप्रमाणे जंगम व स्थावर मालमत्ता खालीलप्रमाणे आहे.

उन्नती शिक्षण संस्था छ. संभाजीनगर. नोंदणी क्रमांक एफ-११७४ या संस्थेच्या मालमत्तेची अंदाजे किंमत..

०१ स्थावर मालमत्ता - रु.२५९७०८५/-
०२. जंगम मालमत्ता -रु.१३८९१३०/-

आश्विनी बहुउद्देशीय शैक्षणिक सेवाभावी प्रतिष्ठाण छत्रपती संभाजीनगर ई-८६५ या संस्थेच्या मालमत्तेची अंदाजे किंमत :-

०१. स्थावर मालमत्ता निरंक
०२. जंगम मालमत्ता या संस्थेमार्फत चालविण्यात येत आसलेली शाळा हेरंब प्राथमिक विदयामंदिर इंग्रजी/ मराठी माध्यम सिडको एन २ या शाळेच्या मान्यतेसह, खालीलप्रमाणे

| तपशिल | संख्या | किंमत |
|---|---|---|
| शिक्षकांसाठी लॉकर कपाट मोठे (Compartment Locker) | ०१ | रु.८११५/- |
| स्पिकर, माईक, माईक, स्टेंड (Sound System Equipment) | ०१ रु. | १३५५०/- |
| संगणक संच (सि.पी.यु. मॉनीटर कि बोर्ड, माउस) | ०१ रु. | १२९७३/- |
| फर्निचर साहीत्य खुर्चा | ०४ | रु.२२६०/- |
| टेबल | ०२ | रु.६०००/- |
| खेळणी (Toys) लेडीज रिंग | २० | रु.१७००/- |
| लगोरी | १० | रु.१२००/- |
| दोरी उडया | १० | रु.८००/- |
| कोण | २० | रु.१००९/- |
| | एकुण | रु.४७६०७/- |

तसेच दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत अखेर-

| | |
|---|---|
| 01. cash Balance in santha - | Rs.11074/- |
| 02. Aurangabad District Co-Bank Heramm Prathamik shala 002711101003215 | Rs.4524/- |
| 03. Bank Of Maharastra CIDCO N-3 (H.M. Herambh Prathamik 60311977260) | RS.6752.52/- |
| 04. Heramb English School Cash Balance | Rs.1504/- |
| 05. Herambh Primary Vidya Mandir Cash Balance | Rs.5314/- |
| | Total 29168.52/- |

उन्नती शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर, नोंदणी क्रामांक एफ-११७४ छ. संभाजीनगर या संस्थेचे अंदाजे वार्षिक उत्पन्न : ३.३६.३३,६७६/-

अश्विनी बहुउददेशीय शैक्षणिक सेवाभावी प्रतिष्ठाण नोंदणी क्रमांक ई-८६५ औरंगाबाद या न्यासाचे वार्षिक उत्पन्न : १३,९६,९७०/-

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस (३०) दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. मा धर्मादाय उप आयुक्त यांचे आदेशाप्रमाणे सदरची नोटिस महाराष्ट्र शासन प्राधिकृत राजपत्रामध्ये प्रकाशीत करण्याचे यापुर्वीच आदेशीत केले आहे.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्क्यानिशी आज दि.२५/११/२०२४ रोजी दिली.

स्वाक्षरीत/-
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

## कै.बाळासाहेब किशनराव देशमुख यांच्या सातव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**हाणेगाव,दि. ०८ डिसेंबर :** देगलूर तालुक्यातील तीन राज्याच्या सीमेवर वसलेल्या हाणेगाव या गावाला धार्मिक सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रात एक मोठी ओळख निर्माण करून देणारे कै. बाळासाहेब किशनराव देशमुख यांच्या सातव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध प्रकारचे सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून अभिवादन करण्यात आले आहे.

कै.बाळासाहेब देशमुख यांनी हाणेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती,नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक,सेवा सहकार सोसायटीचे चेअरमन व आनेक वर्ष ग्रामपंचायतीचे बिनविरोध सरपंच अशी अनेक पदे उपभोगून एक लोकनेता जननायक समाजसेवक विकास पुरुष असे आनेक उपाधी घेण्याचा मान त्यांनी मिळविला अशा या महान लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी त्यांचे चिरंजीव विजयसिंह बाळासाहेब देशमुख, प्रीतम बाळासाहेब देशमुख, प्रशांत बाळासाहेब देशमुख, प्रणव बाळासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दि.३ रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन अभिवादन करण्यात आले यात मंगळवारी सकाळी ११ वाजता कै.बाळासाहेब किशनराव देशमुख यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी अभिवादन सभा घेण्यात आली यावेळी आनेक मान्यवरांनीं हजेरी लावुन लोकनेत्यास अभिवादन केले तर दुपारी अन्नदान करण्यात आले व मंगळवार रोजी रात्री समाजप्रबोनकार महाराष्ट्र भुषण हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे भव्य कीर्तण व भजन करुन पुण्यस्मरण करण्यात आले यावेळी असंख्य लोकांची गर्दी होती हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देशमुख परिवार व गावातील देशमुख मित्रमंडळानी मोलाचे सहकार्य केले आहे.

## निवघा बाजार येथील प्रसूवैद्यकीय दवाखान्याचा रामभरोसे कारभार

**तभा वृत्तसेवा**

**निवघा ,दि. ०८ डिसेंबर :** हादगाव तालुक्यातील निवघा बाजार येथील प्रसूवैद्यकीय दवाखान्यामध्ये शेतकऱ्यांना मोजावे लागतात प्रसूवैद्यकी पल्लेवाड साहेब यांच्या सहीसाठी मोजावे लागतात ३०० ते ४०० रुपये सध्या निवघा परिसरात कोठे मंजुरीसाठी शेतकऱ्याची धावपळ सुरू आहे शेड मंजूर करण्यासाठी प्रसूवैद्यकीय डॉक्टरांची सही लागत आहे या सही साठी डॉक्टर घेत आहेत तीनशे चारशे रुपये शेतकऱ्याचे आर्थिक लूट कधी थांबणार अशी शेतकऱ्यातून मागणी होत आहे निवघा बाजार प्रसूवैद्यकीय दवाखान्यामध्ये कधी जनावराच्या औषध राहतात तर कधी राहत नाहीत डॉक्टर शेतकऱ्यांना सांगता आहेत या उद्या या परवा आज नाही मेडिकल अशी डॉक्टरांचा मनमानी कारभार झालेला आहे..जर सही साठी तीनशे चारशे रुपये लागत आहेत तर पशुवैद्यकीय पल्लेवार कशाची आहे अशी शेतकऱ्यांची चर्चा होत आहे या डॉक्टरांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे. डॉक्टर पल्लेवार यांना विचारणा केली असता ते म्हणत आहेत पेट्रोल खर्च साठी आम्ही सही पैसे घेत असे त्यांनी उत्तर दिले.

## आज कोळी येथे आ. बाबुराव कदम यांचा भव्य नागरी सत्कार, कीर्तन व नगरभोजनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**निवघा ,दि. ०८ डिसेंबर :** तालुक्यातील कोळी येथे गावकऱ्यांच्या लोक सहभागातून आमदार बाबुराव कदम कोह ळीकर यांचा भव्य नागरी सत्कार कीर्तन व नगर भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. तर यावेळी ह. भ. प. निलेश महाराज कोरडे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. आतापर्यंत हदगांव हिमायत नगर तालुक्यात अनेक आमदार होऊन गेले पण असा लोकसहभागातून नगर भोजन कार्यक्रम आजपर्यंत कोणत्याही गावात ठेवला नाही. पण लोकनेते बाबुराव कदम यांच्या प्रती कोळी गावातील नागरिकांनी या नगरभोजन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामुळे संपूर्ण नांदेड जिल्ह्यात कोळी गावाची चर्चा चालू झाली आहे.

नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने अभूतपूर्व यश मिळवले आहे. यामध्ये हदगाव हिमायतनगर विधानसभेच्या माध्यमातून बाबुराव कदम कोहळीकर यांची वर्णी लागली. नवनिर्वाचित आमदार बाबुराव कदम कोहळीकर हे तब्बल ३० हजारापेक्षा जास्त मतांनी निवडून आले होते. त्यांनी त्याचे प्रतिस्पर्धी असलेले काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला होता.

## सुंदरबाई डोंगरे बितनाळकर यांचे निधन .



**उमरी-** उमरी तालुक्यातील मौजे बितनाळ येथिल शेतकरी कष्टाळू जेष्ट महिला सुंदरबाई नागोराव डोंगरे यांचे दि ७ डिसेंबर रोजी २०२४ रोजी सायंकाळी ठिक ४:३० वाजता दिर्घ अजाराने निधन झाले आहे . मुत्यू समयी त्यांचे वय ८० वर्ष होते. त्यांच्या पश्च्छात पती , दोन मुली एक मुलगा नांतवड असा परिवार आहे . त्यांच्या अंत्यसंस्कार दि ८ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४ :०० वाजता त्यांच्या शेतात करण्यात आला आहे . शेतकरीनिष्ट साहेबराव डोंगरे यांची आई तर नंदकुमार डोंगरे ,रमेश डोंगरे , संजय डोंगरे यांची चुलती तर महाराष्ट्र प्रसिद्ध कवी नागोराव डोंगरे सर यांची त्या भाभी होत.

## विजय जोशी यांचे निधन



**नांदेड-**शहरातील यशवंत नगर विस्तारित नजीकच्या परिमलनगर वसाहतीचे संस्थापक सदस्य,रहिवासी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाचे निवृत्त ग्रंथपाल विजय पंडितराव जोशी कोंढूरकर यांचे दि. ६ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा दि. ७ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता राहत्या घरुन निघाली आणि गोवर्धनघाटच्या शांतीधाम स्मशानभूमीत दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून,२ मुली, जावई,नातवंडे असा परिवार आहेगुजराती प्राथमिक शाळेच्या निवृत्त सहशिक्षिका सुरेखा जोशी यांचे ते पती तर बिल्डर सुमंत देशपांडे व उद्योजक नाट्य लेखक सुहास देशपांडे यांचे ते भाऊजी होत.

# नारायणराव चव्हाणलॉ कॉलेजला नॅक समितीचा ग्रेड दर्जा प्राप्त

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**



नारायणराव चव्हाण लॉ कॉलेज, नांदेड येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय मूल्यमापन आणि मान्यता परिषदेच्या (छ-उ) मूल्यांकनामध्ये ३.०५ चा प्रभावी सीजीपीए स्कोर मिळवून महाविद्यालयाने ग्रेड प्राप्त केलेला आहे. दिनांक २८ व २९ नोव्हेंबर २०२४ रोजी महाविद्यालयास नॅक पिर टीमने दोन दिवसीय भेट दिली होती. यावेळी महाविद्यालयातील शैक्षणिक व मूलभूत सेवा सुविधांचे आणि महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यांकन केले होते.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष खा. अशोक चव्हाण, उपाध्यक्षा अमितातार्इ चव्हाण,सचिव डी.पी. सावंत, सहसचिव डॉ. आर. के. शेंदारकर, कोषाध्यक्ष उदयराव निंबाळकर व सर्व कार्यकारणी सदस्य यांनी महाविद्यालयातील सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अथक परिश्रमातून व शैक्षणिक गुणवतेतून महाविद्यालयास ग्रेड मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विना पाटील यांनी महाविद्यालयास ग्रेड प्राप्त झाल्याबद्दल सविस्तर माहिती दिली आणि शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सन्माननीय कार्यकारी मंडळ यांचे आभार मानले व महाविद्यालयाशी संबंधित सर्वांनीच सांघिक कार्य केल्यामुळे हा दर्जा प्राप्त झाला असल्याचे डॉ.विना पाटील यांनी सांगितले. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयीका डॉ प्रतिमा बंडेवार व नॅक समन्वयक डॉ. अमोल करवा तसेच डॉ. व्ही. एस. खाकरे, ग्रंथपाल डॉ. आर.के वाघमारे, डॉ. सी.डी. महाजन, क्रीडा संचालक, डॉ. पी.ई. भोसले, डॉ. एम.जे पाटील, डॉ राजवंतसिंघ कदम्ब तसेच कार्यालयीन अधीक्षक पी.जी. शिंदे, एस. के. लोंढे व महाविद्यालयातील सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे सहकार्य लाभले याबद्दल त्यांनी आभार मानले.

## शिक्षणाची कास धरून संघटित होणं काळाची गरज-सवई

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**

मानव जीवनाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे अत्यंत गरजेचे असून सर्वांनी शिक्षणाची कास धरून संघटित होणं हे काळाची गरज असून आज कालचे तरुण पिढी शिक्षणापासून दुरावत असून मुला मुलींनी शिक्षणाची कास धरून आपलं ध्येय पूर्ण करून समाजासाठी संघटित होणं काळाची गरज असल्याचे मत सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष सवई यांनी उपसरपंच नगर स्वप्नजा गार्डन येथे आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन करताना केले. यावेळी व्यासपीठावर माजी शिक्षण संचालक नंदन नागरे सेवानिवृत्त पोलीस निरीक्षण रामराव बुक्तार मुख्याध्यापक सुरेश पाटील डी .एस. कांबळे पत्रकार गंगाधर गच्चे पोहेका.

ज्ञानोबा टोम्पे मु.अ. भीमराव कल्याणकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना सवई म्हणाले की आजच्या युगामध्ये शिक्षणाचे अतिशय महत्त्व असून शिक्षणामुळे मानवाची प्रगती होते त्यामुळे शिक्षण हे अत्यंत गरजेचे आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे ते प्रत्येकाने घेतलं पाहिजे व स्वतः चा कुटुंबाचा व समाजासाठी आपण आदर्श घेऊन जीवन घडवले पाहिजे आजकाल ची तरुण-तरुणी शिक्षणापासून दुरावत असून त्यामुळे त्यांची अधुगतिकडे वाटचाल होत आहे त्यांना जीवनाचा अर्थ कळत नाही व त्यांची प्रगती होत नाही त्यामुळे शिक्षणाची कास धरून संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. डी एस कांबळे श्रीनिवास फुलपगार भीमराव कल्याणकर सर आदींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला . सर्वप्रथम लक्ष्मण जाधवसह पत्नी तथागत भगवान गौतम बुद्ध व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते प्रतिमा चे पूजन करण्यात आले त्यानंतर बौद्धाचार्य सुरेश लोकडे सर यांनी सर्वांना त्रिशरण पंचशील दिले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन से.नी. मुख्याध्यापक कुमारस्वामी माने यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार गंगाधर गच्चेयांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिद नागरे देवानंद भगत आनंद नरवाडे प्रदीप भगत मिलिंद वागरे निर्मला नरवाडे संभाजी बुकतरे लक्ष्मण कोकरे गणेश सावंत सुनीता गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

## विश्वरत्न डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दीना निमित्ताने मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**



प्रतीक मोटार ड्रायव्हिंग स्कूल व बहुजन संघर्ष सेना यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दीना निमित्ताने आनंद नगर नांदेड येथे मोफ़त एक दिवसीय ड्रायव्हिंग स्कूल प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.ह्या एक दिवसीय मोफत प्रशिक्षण शिबिरात शेकडो तरुण व तरुणींनी प्रक्षिशणाचे धडे देण्यात आले . तसेच विश्वरत्न डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी विमानतळ पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्री गणेश चव्हाण साहेब , संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर,महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता संघरात्न सोनसळे , पत्रकार नंदकुमार बनसोडे, राहुल वाघमारे, गंगाधर झिंझाडे, राजेश चौदंते,जयपाल चिखलीकर, शहाबाज खान , अविनाश जोंधळे, दिनेश ठाकूर , मुंजाजी नरवाडे, यश बहादूरे, मिलिंद जोंधळे, किरण चित्ते, रवी चिखलीकर, नितिन देडे,अमोल, राऊत, वैभव चिखलीकर,अश्विनी भोसले, प्रशांत गवाले , अरुण चिखलीकर,माया जमदाडे , माधव चित्ते, तथागत ढेपे, आदित्य सोनुले , प्रतीक गंगावणे, संदेश हटकर, अनिल दीपक, नागवंत चिखलीकर, शशी चिखलीकर, व इतर सर्व कार्यकर्ते उपस्थित होते .



**बाऱ्हाळी-**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी बाऱ्हाळी येथे अभिवादन करण्यात आले.

## मी आनंद जमनाबाई शंकर पाटील तिडके बोंढारकर आ. आनंदराव बोंढारकर यांनी घेतली शपथ

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**



नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचा भगवा फडकवत विजयी झालेले आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी आज विधानसभेच्या विशेष अधिवेशनात दुसऱ्या दिवशी आमदारकीची शपथ घेतली. मी आनंद जमुनाबाई शंकर पाटील तिडके बोंढारकर असे शपथ घेतो की. शब्दात त्यांनी शपथ ग्रहण केले.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात शिवसेना महायुतीचे उमेदवार म्हणून शेतकरी पुत्र ,अत्यंत संयमी व्यक्तिमत्व जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले होते. माजी खासदार , मंत्री , आमदार हेमंत पाटील आणि महायुतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेऊन बोंढारकर यांच्या रूपाने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेचा भगवा सन्मानाने फडकवला. जातीयतेचे आणि धर्मांधतेचे चक्रव्यूह भेदून नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात आनंदराव बोंढारकर यांनी मिळवलेला विजय हा सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील कार्यकर्त्याचा विजय होता. त्यामुळे नांदेड दक्षिण मध्ये खऱ्या अर्थाने लोकशाहीचा विजय झाल्याच्या भावना व्यक्त होत आहेत. त्यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी शपथ घेतल्यानंतर बोलावण्यात आलेल्या विधानसभेच्या विशेष अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आमदार बोंढारकर यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. संविधानाप्रति आपण कायम एकनिष्ठ राहून सर्वसामान्यांची काम करण्यासाठी कटिबद्ध राहू असा विश्वास ही आ. बोंढारकर यांनी व्यक्त केला.

## समाज कल्याण कार्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयात सकाळी ११ वाजता श्रामनेर प्रशिक्षण केंद्र खुरगाव ता.जि. नांदेड येथील भन्ते, कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच समाज कल्याण कार्यालयाच्या अधिनिस्त असलेले सर्व शासकीय वसतिगृह व शासकीय निवासी शाळा येथे महामानवास विनम्र अभिवादनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास श्रामनेर प्रशिक्षण केंद्र खुरगाव ता.जी. नांदेड येथील भन्ते श्रद्धानंद, भन्ते शील धम्मा,भन्ते सुयश,भन्ते सुनंद, भन्ते सारीपुत उपस्थित होते.सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित भन्ते यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिशरण,पंचशील गाथा व भीमस्मरण सामुहिकरित्या घेण्यात आले.तदनंतर भन्ते श्रद्धानंद यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्याना मार्गदर्शन केले त्यानंतर सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी अभिवादनपर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय नांदेड, जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालय नांदेड, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय नांदेड व सामाजिक न्याय भवनातील सर्व महामंडळे येथील कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार राजेश पवार यांना मंत्रीपद द्यावे ; भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**

**धर्माबाद,दि. ०८ डिसेंबर**

आमदार राजेश पवार यांनी धर्माबाद-८९ नायगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये मागील पाच वर्षाच्या काळात भूतो ना भविष्याती



अशा प्रकारची भरपूर विकास कामे केलेली आहेत. सर्वसामान्य लोकांना हे वृद्धांना देवदर्शन घडून आणले तसेच गोरगरीब लोकांना दवाखान्याच्या उपचारासाठी भरपूर आर्थिक मदत केली आहे. त्याचीच पावती म्हणून मतदार संघातील मतदारांनी त्यांना पुन्हा एकदा आमदार म्हणून भरघोस मतांनी निवडून दिले आहे. म्हणून नांदेड पालक मंत्री तथा मंत्री म्हणून आ. राजेश पवार यांची निवड करण्यात यावी अशी मागणी बाबुराव आलूरकर यांनी केली आहे.

आमदार राजेश पवार यांच्या कार्याची पोचपावती देत त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली असून विधानसभेच्या अधिवेशनात अभ्यासपूर्ण विषयाची मांडणी ही त्यांची नायगाव विधानसभा मतदारसंघच नाही तर महाराष्ट्राच्या समस्यांची तळमळ असल्याचे नमूद करते. तर अखंडितपणे नायगाव विधानसभेचा प्रत्येक गावचा दौरा त्यांनी गेल्या पाच वर्षात कित्येक वेळेस करत गावच्या समस्या व त्यावर कायमस्वरूपी उपाय योजना याविषयी लक्ष देत थेट जनतेशी नाळ अतुट अशी जुळवून घेतली. त्यांनी देव देश आणि धर्म ही संकल्पना साक्षात उतरवत आपल्या मतदारसंघातील लोकांची मने जिंकली कुठलेच जातीपातीचे राजकारण त्यांच्याकडे नसल्याचे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट झाले असून फक्त मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हे त्यांचे ध्येय व ध्यास आहे हे आता सर्वांनाच पटले आहे. त्यांच्यातली अभ्यासपूर्वक धमक बघून व त्यांच्या गुणवत्तेनुसार त्यांना मंत्रिपद देणे योग्यच असल्याचे सामाजिक कार्यकर्ते बाबुराव पाटील आलुरकर यांनी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केलेल्या मागणीत नमूद केले आहे.

## ग्राम महसूल अधिकारी तलाठी संघटनेच्या लोहा तालुका अध्यक्षपदी भूमेश्वर विभूते

**तभा वृत्तसेवा**

**लोहा ,दि. ०८ डिसेंबर**



लोहा तालुका तलाठी संघटनेच्या म्हणजे ग्राम महसूल अधिकारी संघटनेच्या लोहा तालुकाध्यक्ष पदी भुमेश्वर गोविंदराव विभूते याची एकमताने निवड झाली आहे.तहसीलदार विठ्ठल परळीवर यांनी निवडी बद्दल सत्कार केला.

महसूल विभागात तलाठी या पदाचे नाव आता ग्राम महसूल अधिकारी असे झाले आहे. तलाठी (आता ग्राम महसूल अधिकारी) संघटनेचे लोहा तालुकाध्यक्ष मारुती कदम हे होते त्याची बदली झाल्यामुळे रिक्त जागेवर नव्याने निवड करण्यात आली .गोरगरीब माणसांना नेहमीच मदत करणारे व भुकेलेल्या व्यक्तीला जेवण देणारे गोविंदराव विभूते याचे चिरंजीव भुमेश्वर विभुते हे अष्टुर या गावचे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आहेत.लोहा तालुका ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संघटनेच्या अध्यक्ष पदी एकमताने निवड केली आहे.तहसीलदार विठ्ठल परळीवर यांनी भुमेश्वर विभूते याचा सत्कार केला.नायब तहसीलदार अशोक मोकले,नायब तहसीलदार पाठक, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार संदीप हाडगे तसेच बंधू राम विभूते,मंडळ अधिकारी कठारे, सुगावे ,सहारे,श्रीमती पवार,श्रीमती नाशिककर,श्रीमती सुर्यवंशी,मुळजकर,ग्राम महसूल अधिकारी नीळकंठ पांडागळे, निखील सुंदगिरवार,मोतीराम पवार, गाडे पाटील, संतोष अस्कुलकर,परशुराम जाधव, राजू इंगळे, केलास बोधगिरे, बालाजी एकाडे, शहाजी निकम,संजय मेहुनकर, संतोष जाधव, आतीक अन्सारी, राजू सानप, अजय कासले, लाडेकर, राजकुमार मुढे, गोधने, कासेवड, डी जी शिंदे, नितीन रायाजी, सोनुले, हणमंत गायकवाड, माणिक कोकरे,वर्षराणी कुणके, किर्ती रावळे, प्रीती ढेपेकर, सीमा कदम, मायादेवी गोडबोले, सिंगिता राऊत, स्वाती येडे, शामल भावसार, सीमा उजनकर, पुजा गाडे, प्रियांका बने, वंदना शिंदे, महुनकर,प्रियांका भेरवाड, माधुरी मुजाळ, वर्षा सावंत, कुशावर्ता शिंदे तसेच पत्रकार विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी महसूल कर्मचारी यांनी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

# बासर येथे दत्त जयंती उत्साहास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**धर्माबाद,दि. ०८ डिसेंबर**

श्री गुरुमंदीर नागपुर प्रणित श्री नरसिंह सरस्वती सायंदेव सेवा समिती बासर आयोजित श्र दत्त जयंती उत्साहव वर्ष तिसरे निमित्ताने श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह दि ७ डिसेंबर ते १३ डिसेंबर या कालावधीत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती व्यवस्थापन समिती श्री नरसिंह सरस्वती सायंदेव सेवा समिती बासर यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना दिली.

श्री नरसिंह सरस्वती आणि सायंदेव सेवा समिती श्री क्षेत्र बासर यांच्या वतीने धर्मभास्कर प.पु.सदगुरुदास महाराज यांच्या प्रेरणेने जीर्णोद्धारीत झालेल्या श्री



दत्त मंदिर व श्री दत्तधाम पारायण कक्ष येथील श्री दत्त मंदीरात ७ डिसेंबर ते १५ डिसेंबर प्रयंत श्री दत्त जयंती उत्साहवा प्रित्यर्थ विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार सायंकाळी संजय जोशी यांचा भक्ती गितांचा कार्यक्रम, रविवारी दत्त नामाचा महिमा कृष्णकांत लव्हेकर व संच, सोमवारी भजन संध्या भजनी मंडळ वणी, मंगळवारी प्रवचण सेवा, बुधवारी प्रवचण सेवा प्रवचनकार प्राध्यापक मुकुंद मुळे चैत्यन्य उपासणा मंडळ नांदेड, गुरुवारी सुश्राव्य किर्तन किर्तनकार हभप श्री शिंदे महाराज, शुक्रवारी सुश्राव्य किर्तन बालकिर्तणकार कुमारी रेवा प्रशांत जोशी, शनिवार श्र ना रुद्राभिषेक व श्री चा पालखी उत्सव श्री दत्त जन्म सोहळा उपवास प्रसाद सकाळी आठ ते साडेदहा, दुपारी बारा वाजता, दुपारी एक ते तिन, रविवारी काल्याचे किर्तन किर्तनकार भालचंद्र सरदेशपांडे, तसेच महाप्रसाद दुपारी बारा ते तिन सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम काकडा आरती व महापुजा, दररोज सकाळी साडे सहा ते आठ पर्यंत,उपवसना व आरती सायंकाळी सात ते आठ पर्यंत.

दि १४ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता श्र दत्तधाम बासर मंदीरातुन श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांची पालखी नगर प्रदक्षिणा निघेल.

उपासक भक्तांनी मंगल वेशात उपस्थितीत राहावे पालखीच्या मार्गातील भावीकांनी आपल्या घरासमोर सडा समर्जन व रांगोळ्या काढुन पालखिचे भव्यदिव्य स्वागत करावे .टाळ,मृदंग,टिपर्या,भजने इत्यादी रम्य वातावरणात निघणाऱ्या या पालखी मिरवणुकित प्रसन्नचित्ताने सहकुटुंब सहपरिवार सहभागी व्हावे .या शिवाय सप्ताहा मध्ये रात्री च्या वेळी भजन व जागरणाचे कार्यक्रम होतील आसे संयोजकाने उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

रोखठोक

दिनेश गुणे

# सायबर संकटाचे भविष्यभय!

सामाजिक सुरक्षिततेस आव्हान देणाऱ्या किंवा समाजहितास घातक अशा कोणत्याही गोष्टीस लगाम घालावयाचा असेल, तर जनजागृती हा सर्वाधिक महत्त्वाचा उपाय असतो. अशा बाबी लोकांच्या नजरेस आणून देणे व त्यापासून सावध राहण्याच्या सूचना देणे हा जनजागृतीचा मार्ग असल्याने, जेव्हा जेव्हा समाजस्वास्थ्य बिघडविणाऱ्या घटना घडतात, तेव्हा तेव्हा त्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जात असतो. वाढती गुन्हेगारी, फसवणूक, आर्थिक घोटाळे, भ्रष्टाचार आदी अनेक बाबी सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या असतात. त्यांना आळा घालण्यासाठी प्रशासनातील यंत्रणा सतत सजग असतातच, पण समाजाने किंवा नागरिकांनी जागरूक राहून अशा बाबींविरोधात सावधागिरी बाळगली, तर यापासून उद्भवणारे धोके टाळणेदेखील शक्य होते. म्हणूनच, अशा बाबींना आळा घालण्यासाठी केवळ यंत्रणांची सावधगिरी पुरेशी नसते. समाजभान जागे असणेही महत्त्वाचे असते. अलिकडेच रिझर्व्ह बँकेने एका जाहिरातीतून अशाच एका गंभीर गुन्हेगारीकडे समाजाचे लक्ष वेधले. आसपास घडणाऱ्या अशा घटनांच्या बातम्या वाचून, ऐकून किंवा अनेकदा अनुभवूनही त्याबाबत सजग राहिले नाही, तर गुन्हेगारीला शिरकाव करण्याची संधी मिळते आणि त्याचे गंभीर परिणाम समाजास भोगावे लागतात. रिझर्व्ह बँकेच्या त्या जाहिरातीतून अशाच एका आर्थिक फसवणुकीच्या नव्या तंत्रापासून सावध राहण्याचा इशारा प्रसृत झाला आणि त्यापाठोपाठ अशाच गुन्ह्याची शिकार होऊन सर्वस्व गमावलेल्या एका सुशिक्षिताची कैफियतदेखील सुरक्षा यंत्रणांपर्यंत पोहोचली. फसव्या पार्सल स्कॅमपासून सावध राहा, अशा स्पष्ट सूचना गेल्या बुधवारी रिझर्व्ह बँकेने राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रांतील जाहिरातींद्वारे दिल्या होत्या. रिझर्व्ह बँक, सीबीआय, सरकारी एजन्सी, कुरियर कंपनी किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या नावाने तुम्हाला एखादा ऑडिओ किंवा व्हिडीओ कॉल येतो, त्यामध्ये तुमच्यावर एखाद्या गुन्ह्याशी संबंधित असल्याचा थेट ठपका ठेवला जातो आणि कारवाईची धमकी देऊन तुमच्याकडे पैशाची मागणी केली जाते अथवा चौकशीचा फार्स करून मिळविलेल्या माहितीच्या आधारे तुमच्या बँक खात्यातील मोठी रक्कम परस्पर काढून घेतली जाते. फसवणूक झाल्याचे लक्षात येते, तोवर अशी पीडित व्यक्ती कफल्लक झालेली असते.

डिजिटल व्यवहारांचे असंख्य फायदे देशात दिसू लागल्यानंतर डिजिटल फसवणुकीचे गैरप्रकारही देशात वाढू लागल्याने, अनेकांना अशा फसवणुकीचे फटके बसू लागल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्याची गंभीर दखल घेतली. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरच्या आठवड्यातील 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे जनतेशी संवाद साधताना त्यांनीही अशा गुन्हेगारीपासून सावध राहण्याचा इशारा दिला. सावधगिरी बाळगणे, फसवणुकीच्या प्रयत्नांस बळी न पडता अशा चौकशा धुडकावून लावणे हा उपाय केवळ जनजागृतीतूनच करता येतो आणि अशा गुन्हेगारीस रोखता येते. त्यामुळे, फसवणूक झाल्यानंतर डिजिटल गुन्हेगारीचा सुळसुळाट झाल्याच्या तक्रारी करून सुरक्षा यंत्रणा किंवा प्रशासनाच्या नावाने बोटे मोडण्यापेक्षा, या जाळ्यात न फसण्याची खबरदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे. पंतप्रधानांच्या त्या आवाहनानंतर रिझर्व्ह बँकेने जाहिरातीद्वारे दिलेल्या इशाऱ्याची शाईदेखील सुकलेली नसताना दोन-तीन दिवसांपूर्वी मुंबईत गोरेगाव येथे अशाच एका गुन्ह्यास बळी पडलेल्या सेवानिवृत्त व्यक्तीने आपल्या बँक खात्यातील तब्बल ७२ लाखांची रक्कम गमावली आहे. पोलिस अधिकारी असल्याचे भासवून व्हिडीओ कॉल करणाऱ्या व्यक्तीने पार्सलमध्ये अमली पदार्थ असल्याचे सांगून कारवाईची भीती दाखवत पीडित व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशील गोळा केला आणि आधार क्रमांकासह सर्व आवश्यक माहिती घेऊन ही रक्कम परस्पर काढून घेतली. आपली फसवणूक झाल्याचे ध्यानात आल्यावर या व्यक्तीने पोलिसांच्या सायबर गुन्हेविरोधी शाखेकडे तक्रार केली. फसवणुकीने उकळली गेलेली रक्कम परत मिळावी यासाठी पोलिस यंत्रणांनी हातपाय हलवावेत अशी आता या व्यक्तीची अपेक्षा असेल. त्यात गैर नाही, पण सावधगिरीच्या सूचना अखंडपणे चहूबाजूंनी दिल्या जात असतानाही बेसावध राहून अशा गुन्ह्याच्या सापळ्यात सापडण्याचा भोळसटपणा करणाऱ्यांना यापेक्षा वेगळा अनुभव काय येणार या प्रश्नाचे उत्तर अवघड नाही.

गेल्या ऑक्टोबर महिन्यात 'मन की बात' कार्यक्रमातून जनतेस संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अशा गुन्हेगाराविरोधातील सावधगिरीचा गंभीर इशारा देशास दिला होता. देशाच्या कानाकोपऱ्यातील असंख्य नागरिक मोदी यांच्या या आभासी संवाद सभेस आवर्जून हजेरी लावत असल्याने, अशा गुन्हेगारीविषयी एव्हाना देशात पुरेशी जागरूकता निर्माण झाली असतानाही, सायबर गुन्हेगारीच्या या प्रकारास बळी पडण्याचे प्रकारही घडतच असतात. गेल्या काही वर्षांत अशा गुन्हेगारीच्या माध्यमातून कष्टाने मिळविलेल्या कोट्यवधींच्या रकमेवर गुन्हेगारांनी डल्ला मारलाच, पण निष्पाप, निरपराध सामान्य नागरिकांस प्रचंड मनस्तापही भोगावा लागला आहे. अशा गुन्ह्यात हात असल्याचा आरोप करणाऱ्या दूरध्वनीमुळे कुटुंबाचे मानसिक स्वास्थ्य बिघडल्याच्या व मानसिक ताण असह्य झाल्यामुळे मृत्यू ओढवल्याच्या काही घटनादेखील याआधी घडल्या असल्याने, डिजिटल अरेस्ट नावाने फोफावलेली सायबर गुन्हेगारी रोखण्याकरिता जनतेनेच जागरूक राहावयास हवे ही बाब अधोरेखित झाली आहे. थांबा, विचार करा आणि कृती करा हा पंतप्रधानांनी दिलेला कानमंत्र अशी गुन्हेगारी रोखण्यासाठी पुरेसा ठरू शकतो, हेही सिद्ध झाले आहे. असा फोन किंवा व्हिडीओ कॉल आल्यास घाईघाईने प्रतिसाद देऊन आपली वैयक्तिक माहिती देऊ नये, कारण कोणतीही सरकारी यंत्रणा फोनवर धमकी देऊन पैशाची मागणी करत नाही किंवा खाजगी



गोपनीय बाबींची माहिती गोळा करत नाही हे लक्षात घेतल्यास अशा गुन्हेगारीला धुडकावून लावणे शक्य असते. एक है तो सेफ है असा आणखी एक संदेश पंतप्रधानांनी देशाला दिला आहे. आर्थिक फसवणुकीच्या प्रकारांतही हा संदेश ध्यानात ठेवला तर गुन्हेगारी रोखता येऊ शकते. अनेकदा फसवणुकीचे अनुभव इतरांपासून लपविण्याची मानसिकता असते. आपण फसवले गेलो हे सांगणे कमीपणाचे वाटते, त्यामुळे अशा फसवणुकीचा मनस्ताप एकट्यास किंवा त्या कुटुंबास सोसावा लागतो. त्याऐवजी अशा फसवणुकीचा अनुभव इतरांपर्यंत पोहोचविल्यास गुन्हेगारीविरुद्ध एक होऊन सुरक्षिततेचे कवच समाजाभोवती निर्माण होऊन गुन्ह्यास आळा घालणे सोपे होऊ शकते. कारण, डिजिटल अरेस्ट नावाची कोणतीही व्यवस्था कोणत्याही कायद्यात नाही. ही फसवणूक आहे आणि बदमाशांनी सामाजिक अर्थव्यवस्थेवर घातलेला घाला आहे, याची जाणीव रुजविण्यासाठी जनजागृती गरजेची आहे.

डिजिटल गुन्हेगारीचा वाढता सुळसुळाट पाहता, आगामी काळात सायबर गुन्हेगारी हे भारतासमोरील सर्वांत मोठे आव्हान असेल, हे स्पष्ट दिसू लागले आहे. जसजसे तंत्रज्ञान विकसित होत जाते, तसतसा त्याचा गैरफायदा घेण्याचे तंत्रज्ञानदेखील विकसित होत असल्याचे दिसते. त्यातूनच सायबर गुन्हेगारी वाढीस लागली असून कोट्यवधी रुपयांची लूट सुरू झाली आहे. या गुन्हेगारीस आळा घालण्याचे उपाय शोधणाऱ्या असंख्य परिषदा गेल्या काही वर्षांत झाल्या. या क्षेत्रातील तज्ज्ञांनी उपाय शोधण्यासाठी अहोरात्र संशोधने सुरू ठेवली आहेत. पण दहशतवादाहूनही अधिक भय फैलावणाऱ्या व असुरक्षिततेचे सावट माजविणाऱ्या या गुन्ह्याचे आव्हान अधिकाधिक गडद होऊ लागले आहे. दहशतवादाचे जागतिक आव्हान थोपविण्यासाठी सुरक्षा यंत्रणांना काहीसे यश येत असले, तरी सायबर गुन्हेगारी पूर्णपणे रोखणे सोपे नाही याची जाणीव आता या यंत्रणांनाही झाली आहे. समाजमाध्यमांचा प्रचंड फैलाव झाल्यामुळे आभासी मंचाची उपलब्धता आता सर्वांसाठी सोपी झाली आहे. प्रचंड प्रमाणात वाढलेल्या या गुन्हेगारीच्या असंख्य प्रकरणांचा तपास गेल्या दहा वर्षांहूनही अधिक काळापासून संपूर्ण यशाच्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकलेला नाही, ही बाब चिंताजनक आहे. या गुन्हेगारांचा नेमका ठावठिकाणा शोधणे हेदेखील एक आव्हान आहे. अनेकदा हे गुन्हेगार देशाबाहेर असल्याने कायदेशीर कारवाईवरही मर्यादा येत असल्याचे सांगण्यात येते. कृत्रिम बुद्धिमत्ता हे विकसित तंत्रज्ञानाचे वरदान ठरेलच, पण त्याचा गैरवापर झाल्यास तो सर्वांत धोकादायक शापदेखील ठरेल, अशी भीती जागतिक स्तरावर व्यक्त होत असते. सायबर गुन्हेगारीसारख्या प्रकाराने ही भीती वास्तविक असल्याच्या जाणिवा आता होऊ लागल्या आहेत. डीपफेक, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर होणारे सायबर हल्ले नजीकच्या भविष्यकाळात तीव्र होणार आहेत, असा इशारा देणारा 'डाटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया (डीएससीआय)' चा एक अहवाल अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. विशेषतः आरोग्य क्षेत्राशी आणि आर्थिक क्षेत्राशी संबंधित असलेल्यांना ही गुन्हेगारी लक्ष्य करेल, अशी शक्यताही या संस्थेने वर्तविली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून घडणारे असे गुन्हे शोधणे अधिक अवघड होणार आहेच, पण या गुन्ह्यांचे जाळे पसरविणे मात्र सोपे होणार आहे, असा या अहवालाचा इशारा आहे. जानेवारी ते एप्रिल २०२४ या केवळ चारच महिन्यांच्या काळात भारतीय नागरिकांनी अशा गुन्ह्यास बळी पडून तब्बल १७५० कोटी रुपये गमावले, असे केंद्रीय गृहखात्याच्या आकडेवारीवरून दिसते. अशा गुन्ह्यांच्या सुमारे साडेसात लाख तक्रारी गृहखात्याच्या राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर दाखल झाल्या आहेत. या वर्षी पहिल्या पाच महिन्यांतच या तक्रारींमध्ये सात हजारांची भर पडली. गुन्ह्याचे प्रमाण शंभर टक्क्यांहूनही अधिक वाढल्याचे ही आकडेवारी दर्शविते. यापैकी ८० टक्क्यांहून अधिक गुन्हे ऑनलाईन घोटाळे म्हणून नोंदले गेले असून गेमिंग ॲप्स, अधिक परताव्याची प्रलोभने दाखवून ऑनलाईन गुंतवणुकीची आमिषे, ओटीपीच्या माध्यमातून होणारी लुबाडणूक, अशा अनेक प्रकारांचा सुळसुळाट झाला आहे. केवळ डिजिटल अरेस्टसारख्या भयावह गुन्हेगारीतूनच नागरिकांच्या सुमारे सव्वाशे कोटींच्या कमाईवर सायबर गुन्हेगारांनी डल्ला मारला आहे, तर शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या माध्यमातून पैसे कमावण्याच्या प्रलोभनांस बळी पडलेल्या वीस हजारांहून अधिक नागरिकांनी १४०० कोटींहून अधिक रक्कम गमावली आहे.

केवळ आर्थिक लुबाडणूक हेच सायबर गुन्हेगारीचा भस्मासुर रोखण्यापुढील आव्हान नाही, तर या माध्यमातून संवेदनशील माहितीची चोरी, सामाजिक शांततेस धोका निर्माण करणाऱ्या हालचाली रोखण्याचे आव्हानही यापुढे बिकट होत जाणार आहे, असे भाकीत या अहवालाने वर्तविले आहे. सरकारी सेवांच्या नावाने बनावट ॲप्लिकेशन तयार करून लोकांस लुबाडण्याचे व फसविण्याचे प्रकारही वाढीस लागण्याची भीती असल्याने, संपूर्ण व्यवस्थांची विश्वासार्हताही पणाला लागणार आहे. सरकारी सेवांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्यवस्था निर्माण करून त्यामध्ये गुंतवणूक करण्याची आमिषे दाखवून फसविण्याचे प्रकार वाढले, तर ते मोठेच संकट ठरेल, अशी भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. या संकटापासून बचाव करण्यासाठी केंद्र सरकारने व विविध यंत्रणांनी काही उपाययोजना केल्या आहेत, आणि विशेषत: गुंतवणूकदारांचे हितसंबंध व अर्थव्यवहार सुरक्षित करण्याच्या दृष्टीने काही पावलेदेखील टाकली आहेत. शेअर बाजारासारख्या आर्थिक उलाढालीवर केंद्रित असलेल्या व्यवस्थांना वेठीस धरणाऱ्या समांतर गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी सेबीने काही नियामक कृती कार्यक्रम आखला आहे. अनावश्यक सॉफ्टवेअरचा वापर थांबविणे, नियामकांचा वावर मर्यादित करणे, अशा काही उपाययोजनाही सुरू असल्याचे सांगण्यात येते. गुंतवणूकदारांचे आर्थिक संरक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने इंडियन कॉम्प्युटर ॲण्ड इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम, सायबर सुरक्षित भारत, सायबर स्वच्छता केंद्र आणि राष्ट्रीय सायबर सुरक्षितता धोरणही आखले आहे. ही सुरक्षितता निश्चित करण्यासाठी ज्यांची मदत घेता येईल त्या सर्वांस सायबर गुन्हेविरोधी मोहिमेत सहभागी करून घेतले जाणार आहे. ज्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर करून गुन्हेगारीने उच्छाद मांडला, तेच तंत्र वापरून गुन्हेगारी मोडून काढण्याची शिफारस डीएससीआयने केली आहे.

या मोहिमांमुळेच, आसामातील सायबर गुन्हेगारांची एक टोळी उद्ध्वस्त करून पोलिसांनी १४ जणांना अटक केली. गेल्या वर्षी मे महिन्यात सायबर गुन्हेगारीकरिता वापरले गेलेले २८ हजार मोबाईल फोन जप्त करण्याचा आदेश केंद्र सरकारने टेलिकॉम कंपन्यांना दिला होता. त्याशिवाय या मोबाईल फोनशी जोडले गेलेल्या २० लाख मोबाईल फोनची फेरतपासणीही करण्यात आली होती. गेल्या एप्रिल महिन्यात हरयाणातील नूंह जिल्ह्यात ४० जणांची एक सायबर गुन्हेगारी टोळी जेरबंद करण्यात आली. या टोळीने देशभरात धुमाकूळ घालून असंख्यांना लुबाडल्याचे उघड झाले होते. उत्तर भारतातील अनेक गावांत सायबर गुन्हेगारीचे अड्डे असल्याचे उघडकीस येत असल्याने धोक्याच्या घंटा आता अगदी उंबरठ्याशी वाजू लागल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी या गुन्हेगारीवर विदारक प्रकाश टाकणारी जमतारा नावाची मालिका देशभर चर्चेत होती. जमताराच्या कार्यपद्धतीची नेमकी नक्कल करून नागरिकांची आर्थिक लुबाडणूक करणारे अनेक मॉडेल विविध ठिकाणी कार्यरत असल्याच्या संशयावरून आता सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. सायबर गुन्हेगारांना वेसण घालून नागरिकांचे हक्क सुरक्षित राखण्यासाठी सरकारी स्तरावर प्रयत्न सुरू असले, तरी नागरिकांनी जागरूकता दाखविली तरच या युद्धास बळ मिळणार आहे. अन्यथा, सायबर गुन्ह्यांचे भविष्यभय सतत डोक्यावर दाटलेले राहणार आहे.

dineshgune@gmail.com

प्रासंगिक

विनोद देशमुख

# विलक्षण लोकनेता

भाजपा विचार परिवाराचे मुख्यालय आणि देशाचे मध्यवर्ती शहर असलेले नागपूर. येथील भाजपाने गेल्या तीन तपांमध्ये एक नव्हे, दोन दिग्गज लोकनेते पक्षाला, राज्याला अन् देशाला दिले. पहिले नितीन गडकरी आणि दुसरे देवेंद्र फडणवीस. यातील गडकरी राष्ट्रीय राजकारणात आहेत तर देवेंद्र पाव शतकापासून आमदार म्हणून राज्याचे राजकारण करीत आहेत. एवढेच नव्हे, तर राज्याचे सर्वोच्च पद मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता ही तीनही पदे भूषविणारे महाराष्ट्रातील आतापर्यंतचे ते एकमेव नेते ठरले आहेत.

दांडगा जनसंपर्क आणि विकासकामांवर भर हे त्यांच्या कामाचे अन् लोकप्रियतेचे सूत्र आहे. त्यांनी पाच वर्षे मुख्यमंत्री आणि अडीच वर्षे उपमुख्यमंत्री म्हणून आपल्या कामांची चमक राज्यभर दाखवली आणि आपला कायम ठसा उमटवला, हे कोणालाही नाकारता येणार नाही.



समृद्धी महामार्गापासून शेततळ्यांपर्यंत आणि मेट्रोपासून शेतकऱ्यांना वीज बिल माफीपर्यंत समाजातील सर्व वर्गांसाठी विकासाच्या विविध योजना राबविणारा एक चौफेर नेता, अशी देवेंद्र फडणवीस यांची ओळख निर्माण झालेली आहे. गृह, विधि व न्याय, नगरविकास, जलसंपदा, ऊर्जा, गृहनिर्माण ही खाती सांभाळताना त्यांनी त्या त्या खात्यांसाठी मोलाचे राज्यव्यापी निर्णय घेऊन ते राबविले आणि लाखो लाभार्थींना दिलासा दिला. फक्त साडेसात वर्षांत इतकी मोठी कामगिरी करणारे देवेंद्र अनोखे नाहीत, असे कोण म्हणू शकतो ?

लोकसंग्रह आणि नेतृत्व याची बीजे त्यांच्या डीएनएतच असल्याचे विद्यार्थिदशेतच दिसून आले. वडील स्व. गंगाधरराव फडणवीस यांच्याकडून मिळालेला हा वारसा त्यांनी जोपासला आणि वाढवला. भाजपा युवा मोर्चाचे वॉर्ड अध्यक्ष म्हणून वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला, तेव्हापासून गेल्या ३५ वर्षांत त्यांनी एकदाही मागे वळून पाहिलेले नाही. सर्वांत तरुण नगरसेवक, सर्वांत तरुण महापौर, आमदार आणि नंतर थेट मुख्यमंत्री असा त्यांचा नेत्रदीपक प्रवास राहिला. याचे कारण, लोकांचे अपार प्रेम, सहकार्य एका बाजूला तर जनतेची नाडी ओळखून त्यांच्या हिताची कामे झपाट्याने करण्याची हातोटी दुसऱ्या बाजूला, यांच्या संगमातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले आहे.

लोकनेता कसा असावा, याचा आदर्शच त्यांनी घालून दिला आहे. तरुण वयातच लाभलेले लोकनेतेपद त्यांनी वेळोवेळी स्वकर्तृत्वाने सिद्ध करून दाखविले आहे. त्यामुळेच नागपूर शहरातील दक्षिण-पश्चिम (नैर्ऋत्य) नागपूर विधानसभा मतदारसंघाने त्यांना आमदार म्हणून लागोपाठ सहा वेळा निवडून दिले आणि महाराष्ट्राला दोनदा मुख्यमंत्रीही दिला. महाराष्ट्राच्या इतिहासात उपराजधानीच्या नागपूर शहराला पहिल्यांदा मुख्यमंत्रिपदाचा मान २०१४ मध्ये मिळाला तो त्यांच्यामुळेच. मंत्री म्हणून कुठलाही अनुभव नसतानाही देवेंद्र यांनी मुख्यमंत्रिपद समर्थपणे सांभाळले आणि राज्यात विकासाचा अन् क्रांतिकारी निर्णयांचा धडाका लावला, हे संपूर्ण राज्याने पाहिले आहे.

२०१९ मध्ये मतदारांचा स्पष्ट कौल मिळूनसुद्धा शिवसेनेच्या राजकारणापायी भाजपा-शिवसेना युतीचे सरकार गेले आणि देवेंद्र फडणवीसांना विरोधी पक्षनेता व्हावे लागले. ती भूमिकाही त्यांनी चोख बजावली आणि महाविकास आघाडी सरकारचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणला. नंतरच्या राजकीय उलाढालीत एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद देऊन स्वत: उपमुख्यमंत्री होण्याचा उमदेपणा आणि पक्षनिष्ठा यांचे आगळेवेगळे दर्शन त्यांनी घडविले, हे उभ्या महाराष्ट्राने अनुभवले. या कारकीर्दीतही त्यांनी शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दीर्घकालीन 'मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत' योजना आणली आहे. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना वीज बिल पुढील पाच वर्षे माफ करण्याचा हा निर्णय ऊर्जामंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत धाडसानं घेतला आहे. शेतकऱ्यांना पर्यायी सौर ऊर्जा पंप देण्याची योजनाही विजेची मोठी बचत साधण्यातून दुहेरी लाभाची होणार आहे. जलसंपदा मंत्री म्हणून महत्त्वाकांक्षी पाच नद्याजोड प्रकल्प मार्गी लावण्याचे भविष्यासाठीचे फार मोठे काम त्यांनी केले आहे. यात विदर्भातील वैनगंगा-नळगंगा प्रकल्प सर्वांत मोठा असून त्याची अंदाजित लागत सव्वा लाख कोटींच्यावर आहे. पाच लाख हेक्टर शेतजमीन सिंचित करू शकणारा हा महाप्रकल्प विदर्भासाठी वरदानच ठरणार आहे.

शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून इतरांसारखे फक्त मिरवण्यापेक्षा ठोस उपाययोजना आणि त्याचवेळी सर्वांगीण नागरी विकासालाही मोठ्या प्रमाणावर चालना, असे संतुलन साधणारा एक परिपूर्ण लोकनेता देवेंद्र यांच्या रूपात विधानसभेत पाठविण्याचे भाग्य नैर्ऋत्य नागपूर मतदारसंघाला सतत लाभले आहे. त्यांच्या मतदारांनी यंदाही याची पुनरावृत्ती करून त्यांना पुन्हा मुख्यमंत्रिपदी बसविले. वसंतराव नाईक यांच्यानंतर असे फक्त देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दलच घडले आहे. दोघेही वैदर्भीय, हे विशेष.

सहा महिन्यांपूर्वीच्या लोकसभा निवडणुकीत भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी यांच्या महायुतीला महाराष्ट्रात जबर फटका बसला असताना, महायुतीने विधानसभेत अभूतपूर्व यश मिळविले आणि विरोधकांना सातवे आसमान दाखविले. याचे सर्वाधिक श्रेय देवेंद्र फडणवीस यांच्या धडाकेबाज नेतृत्वाला, त्यांच्या कुशल रणनीतीला, सुनियोजित समन्वयाला आहे. त्यांनी भाजपाला सलग तीनदा शंभरी पार नेले आहे. २०१४-१२२, २०१९-१०५ आणि आता विक्रमी २०२४-१३२. गेल्या वेळी उद्धव ठाकरेंच्या महत्त्वाकांक्षेपायी शिवसेनेने बेईमानी केली नसती तर देवेंद्र फडणवीस यांना यावेळी मुख्यमंत्रिपदाची हॅट्ट्रिक करण्याचा नवा विक्रम नोंदविता आला असता. तरीही सर्व जनतेची काळजी वाहताना सामाजिक संतुलन साधणारे सशक्त सरकार मुंबईत प्रकर्षाने हवे असताना तेच 'पुन्हा आले' हेही कमी नाही. अशा या सर्वसमावेशक, संयमित, विकासोन्मुख, कणखर, भविष्यवेधी नेतृत्वाला पुढच्या काळात सतत पाठबळ देणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यांची ही कारकीर्दही संपूर्ण पाच वर्षे यशस्वी होण्यासाठी १४ कोटी जनतेच्या वतीने शुभेच्छा!

९८५०५८७६२२

रविवारची पत्रे

## विरोधकांत शिष्टाचारही राहिलेला नाही

निवडणुकीत जय-पराभव हे तर चालणारच आहे. तुमचे कार्य लोकांना भावले की तुम्हाला मत मिळणार. महाराष्ट्रात निवडणूकीपूर्वी प्रत्येक सभेत इंडिया आघाडीचे नेते व खास करून महाराष्ट्राचे शिवसेना उबाठाचे एकमेव नेते व जनतेचे मनोरंजन करणारे व पत्रकारांना बातमीची खिरापत देणारे संजय राऊत खूप काही बोलत होते. आज ते वक्तव्य आठवले की मजाच वाटते. एकदाची निवडणूक झाली व जनतेने आपला कौल दिला. आता विषय संपायला हवा. आता देवेंद्र, अजितदादा, एकनाथराव हे समस्त महाराष्ट्राचे नेते झाले. मग आलेल्या निमंत्रणाचा मान ठेवण्याचा शिष्टाचार देखील विरोधी विसरले. शपथविधी सोहळ्यात उद्योजक, अभिनेते, लाडक्या बहिणी, सामान्य जन इतकेच काय तर नागपुरातून चहावाला देखील गेला होता. अशावेळी विरोधी पक्षाची उपस्थिती ही मोठेपणा जपणारी असते. पण अजूनही राजकीय शहाणपण आले नाही. उद्धव साहेब सोडा कारण त्यांना सल्ला राऊतांचा आहे. त्यामुळे ते बुडणारच आहे. तसेच तिकडे काँग्रेस तर अगदी डुक लावुन बसली आहे परंतु जाणते शरदराव यांनी तरी मोठेपणा या वयात दाखवायला हवा होता. तेच 'मोठे' झाले असते. परंतु केवळ बोलण्यात वेळ घालवणारे हे विरोधी नेते आलेली वेळ घालवतात हेच खरे. शिष्टाचार हा उत्तम राजकीय खेळीचा एक भाग आहे हे या महाभागांना कोण सांगणार?

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

## ईव्हीएमला दोष, लोकशाहीची थट्टाच!

राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीस घवघवीत यश मिळाले. परंतु या यशाचं गुपित ईव्हीएममध्ये दडलेलं असल्याचा विषारी प्रचार विरोधक करीत आहेत. लोकसभा निवडणुकीत रालोआला महाराष्ट्रासह देशातील अनेक मतदारसंघात पराभवाचा सामना करावा लागला होता. तेव्हा मात्र ईव्हीएमबद्दल एक शब्दही न बोलणारे विरोधक महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवाने विचलित झालेले दिसत आहेत. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर ईव्हीएमवर संशय घेत काही नेत्यांनी तर पुन्हा एकदा मतपत्रिकेवर निवडणूक घ्या आणि निकाल पाहा असे हास्यास्पद विधान केले. ईव्हीएम पद्धती शंभर टक्के अचूक आहे हे अनेकदा सिद्ध झाले आहे, तरीही ईव्हीएमला दोष देणे म्हणजे लोकशाहीची थट्टाच म्हणावी लागेल.

**अखिल देशपांडे**/अकोला

दखल

अजय पत्की

# स्वस्थ समाजाकरिता प्रमाणबद्ध प्रजनन दर आवश्यक



गेल्या महिन्यात नागपुरात कठाळे कुल संमेलन आयोजित करण्यात आले होते. संमेलनात देशभरातून ४०० पेक्षा अधिक कुटुंबीय सहभागी झाले होते. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी भारतातील एकूण प्रजनन दर २.१ च्या खाली गेल्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. सरसंघचालक म्हणाले की, बदली दरापेक्षा टीएफआर (टोटल फर्टिलिटी रेट) कमी होणे म्हणजे समाजाचे अस्तित्व कोणीही नष्ट केल्याशिवाय आपोआप संपुष्टात येऊ शकते. त्यामुळे आपला समाज दीर्घकाळात नामशेष होण्याचा धोका आहे, जे मोठ्या चिंतेचे कारण आहे. त्यांनी म्हटले आहे की टीएफआर कोणत्याही परिस्थितीत २.१ च्या खाली येऊ नये.

सरसंघचालकांनी विधान पहिल्यांदाच केलेले नाही. यापूर्वीचे सरसंघचालक स्व. श्री. सुदर्शनजी यांनी देखील असे विधान काही वर्षांपूर्वी केलेले होते आणि तेव्हा देखील तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. संघाप्रमाणेच संघ प्रेरित संघटनांमध्ये देखील सरसंघचालकांचे मार्गदर्शन आणि विविध प्रसंगी केलेल्या सूचना यावर गांभीर्याने अध्ययन आणि चर्चा होत असतात. स्वदेशी जागरण मंचाच्या बैठकीतून या विषयावर यापूर्वी कार्यकर्त्यांचे अनेकदा प्रबोधन करण्यात आले आहे. इतकेच नव्हे तर स्वदेशी जागरण मंचने लखनौ येथे जून २०२४ मध्ये झालेल्या राष्ट्रीय परिषदेच्या बैठकीत या संदर्भात एक ठराव देखील संमत केला होता.

झपाट्याने कमी होत असलेला एकूण प्रजनन दर (टीएफआर), म्हणजे सरासरी १५-४९ वर्षे वयाची महिला तिच्या आयुष्यात किती मुलांची निर्मिती करते, भविष्यातील लोकसंख्येचा आकार, ज्यामध्ये घट होण्याची अपेक्षा आहे, आणि आपला समाज व्यक्त करतो अशा त्याच्या अस्तित्वावर होणाऱ्या परिणामांबद्दल हे लक्षात घेण्यासारखे आहे की लॅन्सेटने आपल्या ताज्या प्रकाशनात २०२१ सालापर्यंत भारताचा टीएफआर १.९१ पर्यंत कमी झाल्याचे सांगितले होते. येथे हे उल्लेखनीय आहे की सन १९५० मध्ये प्रजनन दर प्रति स्त्री ६.१८ मुले होता.

२.१ च्या टीएफआरला 'रिप्लेसमेंट-लेव्हल प्रजनन क्षमता' मानले जाते. याचा अर्थ असा की दोन मुले असलेली स्त्री स्वतःच्या आणि तिच्या जोडीदाराच्या जागी दोन नवीन जीवन आणते. त्यातून हे सुनिश्चित होते की पुढची पिढी स्वतःची जागा घेते. देशाची लोकसंख्या प्रत्यक्षात कमी होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल, असे सरसंघचालकांनी म्हटले आहे. आपण हा इशारा गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. कारण जागतिक स्तरावर, कल सामान्यतः टीएफआरमध्ये घट होण्याकडे आहे. आपण पाहतो की, सतत घसरत असलेले आणि कमी टीएफआर असलेले विकसित देश त्यांच्या लोकसंख्येच्या आकुंचनाला सामोरे जात आहेत. दक्षिण कोरिया, जपान, जर्मनी इ.मधील एकूण प्रजनन दर २.१ च्या बदली पातळीपेक्षा खूप खाली घसरला आहे. त्यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. भारताने या देशांकडून शिकले पाहिजे आणि घसरत चाललेला दर पूर्ववत् करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. या उपाययोजना करणे क्लिष्ट आणि अति दीर्घकालीन असते. उपाययोजनांचे परिणाम दिसायला अनेक वर्षे लागू शकतात. त्यामुळे तातडीने निदान व्यापक प्रबोधनाला सुरुवात करणे अत्यावश्यक आहे.

**राष्ट्रीय परिवार आणि स्वास्थ्य सर्वेक्षण ५ नुसार प्रजनन दराची २०२१ ची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **उत्तर भारत** | | - तामिळनाडू : | १.८० | - गुजरात : | १.९० |
| - उत्तर प्रदेश : | २.३५ | - तेलंगणा : | १.८२ | - मध्य प्रदेश : | २.०० |
| - उत्तराखंड : | १.९० | - पुद्दुचेरी : | १.७० | - महाराष्ट्र : | १.६८ |
| - पंजाब : | १.६३ | | | - राजस्थान : | २.०० |
| - हरयाणा : | २.०० | **पूर्व भारत** | | | |
| - हिमाचल प्रदेश : | १.७० | - आसाम : | १.९० | **उत्तर-पूर्व भारत** | |
| - जम्मू-काश्मीर | १.४० | - बिहार : | ३.०० | - अरुणाचल प्रदेश : | २.११ |
| - लद्दाख : | १.३० | - झारखंड : | २.३० | - मणिपुर : | २.१७ |
| | | - ओडिशा : | १.८० | - मेघालय : | २.९१ |
| **दक्षिण भारत** | | - पश्चिम बंगाल : | १.६० | - मिजोरम: | २.०७ |
| - आंध्र प्रदेश : | १.७० | | | - नागालॅण्ड : | १.७१ |
| - कर्नाटक : | १.७० | **पश्चिम भारत** | | - सिक्कीम : | १.०५ |
| - केरळ : | १.८० | - गोवा : | १.३२ | - त्रिपुरा : | १.७७ |

२०२० मध्ये महाराष्ट्रातील एकूण प्रजनन दर (टीएफआर) १.५०० होता, जो विक्रमी कमी होता. २००५ ते २०२० या कालावधीत महाराष्ट्रातील टीएफआर सरासरी १.८०० होता, २००५ मध्ये हा सर्वाधिक २.२०० च्या शिखरावर होता. महाराष्ट्रासाठी टीएफआर भारताच्या रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्तालयाने नोंदवला आहे.

बालमृत्यू दरात घट झाल्यामुळे देशातील तरुण लोकसंख्या सातत्याने वाढू लागली आहे, ज्याला 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' म्हणून ओळखले जाते. २००१ ची आकडेवारी घेतली, तर देशातील तरुणांची (१५ ते ३५ वर्षे वयोगटातील) लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ३३.८० टक्के होती, जी २०११ मध्ये वाढून ३४.८५ टक्के झाली. सध्या ती एकूण लोकसंख्येच्या ३५.३ टक्क्यांहून अधिक आहे. आपली लोकसंख्या पाहिल्यावर हे स्पष्ट होते की आज भारतामध्ये इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत आपली तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. लोकसंख्येचा हा भाग देशाच्या विकासात अधिक योगदान देऊ शकतो. ही आपली जमेची बाजू आहे. बदलत्या काळानुसार, अर्थशास्त्रज्ञांना हे समजू लागले आहे की वाढती लोकसंख्या आता एक ओझे नाही आणि आरोग्य सेवांमध्ये झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे मृत्युदरात, विशेषतः बालमृत्यूमध्ये मोठी घट झाली आहे, ज्यामुळे आपल्या मुलांची दीर्घकाळ जगण्याची क्षमता देखील वाढली आहे.

### लोकसंख्याशास्त्रीय लाभांश राष्ट्राच्या विकासात योगदान

प्रजनन दर प्रतिस्थापन दरापेक्षा कमी झाल्यास आमच्या मुलांच्या जगण्याची शक्यता वाढवण्याचे आमचे प्रयत्न पुरेसे ठरणार नाहीत. २००० च्या भारताच्या लोकसंख्या धोरणातही स्पष्टपणे नमूद केले आहे की, क्रॉस-सेक्टरल ॲक्शन स्ट्रॅटेजीज अवलंबून, २०१० पर्यंत टीएफआर ते रिप्लेसमेंट लेव्हल (२.१ चा टीएफआर) वाढवणे हे मध्यम-मुदतीचे ध्येय आहे.

सामाजिक विकास, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत आर्थिक वाढीच्या गरजा पूर्ण करू शकतील अशा पातळीवर २०४५ पर्यंत लोकसंख्या स्थिर करणे हे त्याचे दीर्घकालीन उद्दिष्ट पुढे ठेवले गेले आहे. टीएफआरमधील या ढासळत्या कलाबद्दल चिंता करून, स्वदेशी जागरण मंच भारतातील सामान्य लोकांना आणि विशेषत: मत निर्माते, धोरण विश्लेषक आणि धोरण निर्मात्यांनी या मुद्यावर खोलवर विचार करण्याचे आवाहन करतो की टीएफआरमधील घट प्रतिस्थापन पातळीच्या खाली आहे, जी दीर्घकाळात समाजाच्या अस्तित्वासाठी हानिकारक आहे. आपण हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे की आज भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावत असलेली देशाची लोकसंख्या टिकवून ठेवायची आहे, जेणेकरून आपल्या विकासाच्या प्रयत्नांमध्ये कोणताही अडथळा येणार नाही. तसेच हेही समजून घेतले पाहिजे की जर आपण या संदर्भात सावधगिरी बाळगली नाही तर, कमी होत जाणारा एकूण प्रजनन दर लोकसंख्येमध्ये एक धोकादायक असंतुलन निर्माण करू शकतो ज्यामुळे अवलंबित्वाचा भार वाढू शकतो आणि आपला विकास कमी होऊ शकतो.

आपल्या प्रगत आणि शिक्षित समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची २०२३ ची ताजी आकडेवारी केवळ काळजी करण्यासारखीच नव्हे तर चिंताजनक म्हणजे प्रजनन दर १.५० पेक्षा कमी झाली असल्याचे संकेत आहेत.

विश्व आरोग्य संघटना, विदेशी औषध उत्पादक कंपन्या, सामाजिक प्रबोधन करणाऱ्या जागतिक संघटना आणि वैश्विक सामाजिक माध्यमे यांनी विशेषतः उदारीकरणानंतर म्हणजे १९९१ नंतर आपल्या देशात कुटिलतापूर्वक जो धुमाकूळ घातला त्याचा परिणाम आहे. 'हम दो, हमारे दो', 'छोटा परिवार, सुखी परिवार' या आकर्षक घोषणांनी जगासमोर अनेक बिकट प्रश्न निर्माण झाल्याचे जागतिक स्तरावर स्वीकारले जात आहे. वाढत्या लोकसंख्येकरिता अन्नधान्य, शिक्षण, वैद्यकीय सुविधा पुरविणे अशक्य असल्याचा निर्वाळा देत दोनपेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्यांच्या सुविधा रद्द करण्यापर्यंत नियम ताणले गेले. विशिष्ट वर्ग या नियमांचा बळी ठरला. देशातल्या बुद्धिजीवी, अध्ययनशील समाजशास्त्री, राष्ट्रप्रेमी आणि एकूणच समाजाने या विषयाच्या विविध आयामांचे सखोल अध्ययन आणि चिंतन करून विशेषत: तरुणांमध्ये व्यापक प्रबोधन करण्याची गरज आहे. अनेकांसोबत चर्चा केल्यानंतर वर्षानुवर्षे समाजकार्य करणाऱ्या अनेकांना देखील या सामाजिक प्रश्नाची साधी तोंडओळख सुद्धा नाही असे ध्यानात येते. अध्ययनकर्त्यांनी या विषयाच्या आयामांवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकावा असे वाटते.

अ. भा. सह संयोजक, स्वदेशी जागरण मंच
९४२२१०४८२१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना केले अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जालना जिल्ह्याच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जालना जिल्हा अध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण,जालना जिल्हा सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष प्रभाकर घेवंदे,जालना शहर महिला अध्यक्ष रिंकल तायड, रायुकाँचे शहराध्यक्ष रोहित अग्रवाल,जालना तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे, पद्माकर हांडे, गणेश डुकरे, नवनाथ लोखंडे, सतीश फतपुरे, श्री.दाभाडे यांच्या सह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध संघटनांच्या वतीने रक्तदान शिबिरात अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. एक वही एक पेन अभियानास यावेळी जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी सहकार्य केले.



# संविधानाचा सन्मान फक्त प्रती वाटून नव्हे तर अंमलात आणूनच होईल- अ‍ॅड.धन्नावत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

संविधानाचा सन्मान फक्त प्रती वाटून नव्हे तर अंमलात आणूनच होणार असल्याने, त्यादृष्टीने तसे प्रयत्न करायला हवेत, असा आग्रह सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. महेश सिताराम धन्नावत यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे एका पत्राद्वारे केला असून, नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्याची मागणीही केली आहे.

अ‍ॅड. धन्नावत यांनी महानगरपालिकेच्यावतीने संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्याबद्दल प्रशंसा केली. परंतु, संविधानातील आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ प्रतिकात्मक आयोजन पुरेसे नाही, असेही म्हटले आहे. रस्त्यांची दुरुस्ती, गटारांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक स्वच्छता यासारख्या नागरी मूलभूत सुविधा पुरविण्यात याव्यात, याकडे लक्ष वेधले आहे. जालना शहरातील अनेक भागात, जसे की कालीकुर्ती आणि ज्येष्ठ नागरिक शर्माजी यांच्या घराजवळील गटारांवर झाकण नाहीत,



ज्यामुळे घाण आणि पाणी साचण्याची समस्या वाढत आहे. कॉलेज रोडसह शहरातील अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याबद्दलही चिंता व्यक्त केली. संविधानाच्या उद्देशिकेतील आदर्श आत्मसात करून जनसेवेद्वारे आपल्या कर्तव्यांचे पालन करावे, अशी विनंती अ‍ॅड. धन्नावत यांनी महानगरपालिकेला केली असून, जर असे झाले नाही, तर ते संविधानाचा अपमान ठरेल, असे म्हटले आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकाऱ्यांनाही देण्यात आली आहे. निवेदन देताना ड. महेश धन्नावत यांच्यासोबत ड. महेश गाडेकर हेसुद्धा उपस्थित होते.

## संक्षिप्त

# होमगार्ड संघटनेच्या वतीने ७८ वा वर्धापन दिन वृक्षरोपण करून केला साजरा



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

होमगार्ड संघटनेचा ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त भोकरदन पोलीस ठाण्याच्या होमगार्ड संघटनेच्या वतीने दिनांक ८ रविवार रोजी वृक्षारोपण व साफसफाई करून वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी शहरातील स्मशानभूमीच्या परिसरात विविध प्रकाराचे वृक्षारोपण करून या परिसरात लागवड करण्यात आली असून या परिसराची साफसफाई करण्यात आली,गणेश भवर तालुका पीटीसी होमगार्ड, समाधान दसपुते, शरद बर्डे, गजानन सुरडकर,शिवाजी साबळे, गणेश पोपळघट,राजकुमार लोखंडे,अविनाश थोटे, वैभवी सोरमारे,कांता शिरसाठ,वैशाली शिरसाठ,ज्ञानेश्वर राजळे,सुखदेव तळेकर यांच्यासह आदी होमगार्ड कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त कोठारा जैनपुर येथे अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील कोठारा जैनपूर येथे जगद्गुरु राष्ट्रसंत श्री संत तुकाराम महाराज महाराज यांच्या मुळ गाथ्याचे लेखनकर्ते व तेली समाजाचे आराध्य दैवत श्री संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांना आज दि ०८ रविवारी जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून येथील ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच दत्तू सोनवणे, रामेश्वर क्षीरसागर, राजू लुटे, आकाश खैरे, बबन लुटे, गुलाब लुटे, रत्नाकर लोखंडे, शिवाजी लुटे, गणेश लोखंडे, रत्नाकर लोखंडे, अर्जुन टोम्पे, अंकुश टोम्पे, सुनील लुटे, गोपाल लोखंडे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.





महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार साहेब यांची आ. अर्जुनराव खोतकर व आ. हिकमत दादा यांनी भेट घेऊन उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# सर्व निवडणुका मतपत्रिकेवर घ्या, मागणीसाठी शहर जिल्हा काँग्रेसच्या स्वाक्षरी मोहीमेला सुरुवात

## प्रत्येक वार्डात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येईल- शेख महेमूद

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



सर्व निवडणुका मतपत्रिका (बॅलेट) पेपरवर घेण्यात याव्यात या मागणीसाठी प्रदेश काँग्रेस कमिटीच्यावतीने स्वाक्षरी मोहीम सुरु करण्याचा आदेश जारी केल्याने आज गुरुवार रोजी जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने स्वाक्षरी मोहीमेचा शुभारंभ करण्यात आला.

प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्या नेतृत्वाखाली राज्यात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे. जालना शहरात गुरुवार रोजी खा . डॉ. कल्याणराव काळे यांच्या नेतृत्वाखाली जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पक्ष कार्यालय रेल्वे स्टेशन रोड, जालना येथे स्वाक्षरी मोहीमेचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये सामान्य नागरिकांनी उत्स्फुर्त भाग घेतला. ही मोहीम दि.२० डिसेंबरपर्यंत सुरु राहणार आहे.

यावेळी बोलतांना जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद यांनी सांगीतले की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खा. मल्लीकार्जुन खरगे यांनी इव्हीएम मशीन हटवून मतपत्रिका (बॅलेट) पेपरवर मतदान घ्या, अशी मागणी केंद्रिय निवडणूक आयोगाकडे केली आहे. काँग्रेसपक्ष राज्यात या बाबतीत स्वाक्षरी मोहीम राबवून राज्यात प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने स्वाक्षरीचे निवेदन देणार आहे. शेख महेमुद पुढे म्हणाले की, शहरातील प्रत्येक वार्डात ही मोहीम राबविण्यात येणार असून, काँग्रेस आघाडी व सर्व सेलचे पदाधिकारी यांचा सक्रीय सहभाग राहणार आहे. यावेळी माजी गटनेते गणेश राऊत यांनी बोलतांना सांगीतले की, शहरातील झोपडपट्टी भागात ही स्वाक्षरी मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येईल.

या प्रसंगी महिला जिल्हाध्यक्ष नंदाताई पवार, शहराध्यक्ष वैभव उगले, माजी नगरसेवक अशोक नावकर, अ.बासेत कुरेशी, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष जावेद बेग, बळीराम तिडके, जिल्हाध्यक्ष प्रमोद अल्हाट, निलेश दळे, सुरज एन्गटवाड, जावेद शेख, इम्रान बिल्डर, गणेश चांदोडे, खालेद मशायक, सुनिल सोनवणे, शेख शकील, शेख रफीक, वसिम कादरी, सिराज पटेल, बाबासाहेब सोनवणे, अनसार कुरेशी, सय्यद अलताब, भगवान कावळे, अलीअहमद आदि कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गणेश चांदोडे यांनी केले.

# सामाजिक जानींवांचा भार वाहणारे कधीच निवृत होत नसतात –सोळंके



**तभा वृत्तसेवा**
**परतूर /प्रतिनिधी**

जे सतत सामाजिक जानींवांचा भार वाहतात ते कधीच निवृत होत नसतात असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार कैलाश सोळंके यांनी केले तालुक्यातील सिंगोना जिल्हा परिषदेचे निवृत्त शिक्षक रंगनाथ ढवळे यांच्या निरोप समारंभत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते यावेळी अध्यक्ष म्हणून श्री. काकडे चिंतामणी लाभले प्रमूख चाहूणे म्हणून पत्तरकार श्री– कैलासराव सोळंके, केंद्रे मॅडम, अंबुलगे मॅडम म्हणून उपास मुंडे सर आदींची उपस्थिती होती . यावेळी बोलताना पत्रकार सोळंके यांनी रंगनाथ ढवळे सर यांना सेवानिवृत्ती बद्दल शुभेच्छा देत पुढे म्हटले कि दबले यांनी सिंगोना येथे तब्बल १३ वर्ष शिक्षणदानाचे उत्कृष्ठ कार्य करत आदर्श शिक्षकांचा परिचय दिला असून. येथील विद्यार्थी घडवीण्यात त्यांचा मोलाचा वाटा असल्याच्या भावना व्यक्त करत. त्यांचे कार्य सर्वांना नेहमी आठवत राहतील त्यांच्या विचारायांचा वारसा या शाळेत कायम चालू राहण्यासाठी सर्वांनी प्रेरणा व परिश्रम घ्यावे अशा भावना शेवटी त्यांनी व्यक्त केल्या.या कार्यक्रमात सावंत सर, श्री. लहाने सर यांनी ढवळे सर यांच्या कार्याचे कौतुक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कुलकर्णी मॅडम यांनी तर सोईतकर यांनी आभार व्यक्त केले . या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालकांची मोठ्या संख्येने उपस्तिती होती.

# लॉयन्स क्लब ऑफ परतुरच्या वतीने तीन दिवसीय कराटे प्रशिक्षण शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/ प्रतिनिधी**

लॉयन्स क्लब ऑफ परतुर च्या वतीने शालेय मुलींना आत्मसंरक्षण चे प्रशिक्षण कस्तुरबा गांधी विद्यालय आंबा येथे दि.०५ डिसेंबर ते ०७ डिसेंबर तीन दिवसीय आत्मसंरक्षण शिबिर घेण्यात आले आहे. परतूर शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून लॉयन्स क्लब ऑफ परतूर. यांच्या वतीने वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करून उपक्रम राबवत आलेले आहेत. यामध्ये हा एक महत्वाचा कार्यक्रम मुलींनी स्वतःचं रक्षण करावं यासाठी हा उपक्रम राबवण्यात आलेला आहे. या वेळी , लॉयन्स क्लबचे अध्यक्ष, लॉ. प्रमोद टेकाळे.सचिव,लॉ. मुकुंद शेपाळ. कोषाध्यक्ष,लॉ. मधुकरराव भोसले.डॉ. दत्तात्रेय नंद.डॉ.सौ. भक्ती नंद. कस्तुरबा गांधी विद्यालया च्या मुख्याध्यापिका, साळवे ज्योती बन्सीधर. शिक्षिका, संगीता गोरे. कुलकर्णी शीतल. जाधव राजश्री. खवणे मंगल. वायकोस नयना. घुले देउबाई. ब्रह्मा रंगारी यांच्या उपस्थितीत तीन दिवसीय शिबिराला सुरुवात करण्यात आली होती.परतुर येथील सोतोकान कराटे च्या विद्यार्थ्यांनी शिबिराच्या पहिल्या दिवशी सेल्फ डिफेन्स कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. पूर्वा मॅकेवार. राबिया सिद्दिकी. वैष्णवी आढाव. समृद्धी गाढवे. श्रावणी लोहगावकर. रिहान शेख. शेख मोहम्मद मलिक. ध्रुव सोळंके.शिवम मोताळे. श्रीतेज भामट. यांनी कराटे प्रात्यक्षिक करून दाखवले.कराटे मास्टर, माणिक जैस्वाल यांच्या सहकार्याने कस्तुरबा गांधी विद्यालय आंबा येथील शालेय मुलींना आत्मसंरक्षण प्रशिक्षणा चा लाभ या शिबिरामुळे घडला आहे.

# आ.बबनराव लोणीकर यांना कॅबिनेट मंत्रीपद द्यावे – पालवे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

परतुर मंठा विधानसभा मतदारसंघाचे असलेले विद्यमान आमदार श्री बबनराव लोणीकर हे पाचव्यांदा विजयी झाले यंदाच्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी ७० हजार ६५९ मध्ये मते घेऊन विजय मिळवला आहे विजयाची हॅट्रिक करणारे आमदार लोणीकर यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्यात यावे अशी मागणी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस तथा महामंत्री मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सदस्य विकास पालवे यांनी केली परतूर म्हणता विधानसभा मतदारसंघात आमदार लोणीकर यांची पकड मजबूत आहे मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर झालेले विकास कामे लक्षात घेता या मतदारसंघात आता भाजपाच्या बाल किल्ला कोणी हात घालू शकत नाही



असा हा मतदारसंघ ओळखला जातो यांनी मतदारसंघातील मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत त्यामुळे परतून म्हणता मतदार संघातील मतदारांनी त्यांना पुन्हा पाचव्या संधी दिली आहे राज्यातही महायुतीचे सरकार आल्याने नव्याने स्थापना होत असलेल्या मंत्रिमंडळात आमदार लोणीकर यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्याची मागणी परतुर मंठा विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे कार्यकर्ते कोमल सेठ कुचेरिया प्रकाश इंगल महाराज सुखदेव दराडे केशव येऊल अरुण सदावर्ते स्वरूप सानप दिगंबर जायभाये दिलीप जोशी कृष्णा केंद्रे गणेश मोरे रामकिसन सरकटे नितीन सरकटे रामकिसन बोडके दत्ता कांगणे सुनील कांगणे शिवशंकर डोईफोडे सचिन डोईफोडे बाजीराव आघाव गजानन कांगणे अशोक राठोड उद्धव पवार विठ्ठल सांगळे सचिन चाटे सुभाष लाड गणेश कापकर ज्ञानेश्वर येऊल शिवाजी खरात राम येऊल शिवाजी थोरवे गजानन महाजेन सतीश सदावर्ते सौरभ माहुरकर समाधान वाघमारे भास्कर ढाकणे राम रामेश्वर ढाकणे अचितराव आंभोरे दिलीप पवार दिलीप बानाईत बाळु घुगे समाधान डोळे रमेश पवार विशाल गीते विजय मुन्ढे गजानन किटाळे आसाराम खरात गजानन राठोड सनजय राठोड यांनी केली

# यळकोट यळकोट...जय मल्हार च्या घोषणांनी देवगाव खवणे दणाणले







**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील देवगाव खवणे येथील शेकडो वर्षांपासून दलित,इतर मागास,सवर्ण सर्व जातीधर्माच्या भाविकांचे श्रध्दास्थान श्री श्रेत्र खंडोबा मंदिर देवगाव खवणे असुन येथे प्रत्येक वर्षी मोठा उत्सव असतो, या भागातील सर्व सामाजातील नागरीक एक होऊन उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात.

शेकडो वर्षांपूर्वी दलित– सवर्ण असा टोकाचा संघर्ष होता, देशभर छुत अछुत चे सामाजिक वातावरण होते त्या काळाच्या शेकडो वर्षांपूर्वी पासून आमच्या खंडेरायाच्या लग्नाला, खंडोबा मंदिरात कुठलाही भेदभाव न करता सर्व जातीधर्मांचे आम्ही भाविक चंपाषष्ठी महोत्सव उत्साहात साजरा करत असतो, तसेच या गावातील देशभर कुठेही असलेले जवळपास सर्व गावकरी या उत्सवास नातेवाईकांसह हजर रहातात, यळकोट यळकोट....जय मल्हार च्या घोषणांनी परीसर दणाणून काल गेला होता.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री लक्ष्मी-नरसिंहला मंत्री पदासाठी महाभिषेक

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.८ डिसेंबर -**

तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना महाराष्ट्र राज्यातील मंत्री मंडळात केबिनेट मंत्री धाराशिव जिल्हाचा पालकमंत्री म्हणून वर्णी लागवी यासाठी तेर येथे श्री लक्ष्मी नरसिंहास महाभिषेक करण्यात आला.



धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री लक्ष्मी नरसिंह मंदिरात रविवारी दि.८ डिसेंबर रोजी मंदिराचे पुजारी विजयकुमार बडवे यांच्या हस्ते सदरील महाभिषेक करण्यात आला.

तेरचे सुपूत्र आ. राणाजगजितसिंह पाटील यांना महाराष्ट्र मंत्री मंडळात केबिनेट मंत्री व धाराशिव जिल्हाचे पालकमंत्री मिळावे म्हणून ही महापुजा करण्यात आली आहे.




## संक्षिप्त वृत्त...



### मुल्य साखळी योजनेतून खामसवाडीत बॅटरी संचलित स्प्रे-पंपाचे वाटप

**खामसवाडी, दि.८ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे सोयाबीन अणि कापूस मुल्य साखळी योजने अंतर्गत बॅटरी ऑपरेटेड फवारणी स्प्रेपंपासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन कृषि विभाग तर्फे करण्यात आले होते. त्याला खामसवाडी गावातील शेतकऱ्याकडून मोठ्या प्रमाणामध्ये प्रतिसाद भेटला होता. त्याअंतर्गत प्राप्त ऑनलाईन अर्जाची ऑनलाईन पद्धतीने राज्यस्तरावर सोडत होऊन लक्षांक अनुसार शेतकऱ्यांची निवड करण्यात आली होती. त्यानुसार निवड झालेल्या शेतकऱ्यांना तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांचे मार्गदर्शनाखाली बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपाचे मोफत वाटप ग्रामपंचायत कार्यालय खामसवाडी येथे करण्यात आले. सदरील बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप वितरण कार्यक्रमासाठी कृषी सहाय्यक बालाजी देशमुख, अतिश नाईकवाडी व निवड झालेले शेतकरी अणि गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### 'अभाविप' उमरगा शहराची नूतन कार्यकारिणी जाहीर

**उमरगा, दि.८ डिसेंबर -**

महाविद्यालयातील वाढीव फी व इतर अनेक विद्यार्थी समस्या यांचे निराकरण करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ अखिल भारतीय विद्यार्थी परिषदची नूतन शहर कार्यकारिणी शासकीय विश्रामगृह उमरगा येथे घोषित करण्यात आले. तसेच निर्वाचन अधिकारी म्हणून गणेश कटके यांनी शहर मंत्री नावाची घोषणा करण्यात आले. नुतन शहर कार्यकारिणी खालील प्रमाणे घोषित करण्यात आली आहे. शहर मंत्रीपदी अमृता मुगळे, सहमंत्री ओम पाटील, ऋतुजा कोळी, सोशल मीडिया संयोजक अभिषेक मिसाळ, मिशन साहसी संयोजक गौरवी कटके, स्टुडन्ट फॉर डेव्हलपमेंट संयोजक प्रणित जांभळे, स्टुडन्ट फॉर सेवा माधुरी अगडे, राष्ट्रीय कला मंच संयोजक मैथीली हरके, खेलो भारत संयोजक प्रतिक्षा राठोड, शहर कार्यकारणी सदस्य प्रिती गायकवाड, राधा मंमाळे, वैष्णवी थिटे, अजय टोले, शेखर सुर्यवंशी, उपाध्यक्ष सृष्टी कस्तुरे, मंत्री ऋषी चिंचोळे, कार्यक्रम प्रमुख रुतिका लोहार. यावेळी अभाविप धाराशिव जिल्हा पुर्णवेळ अजय टोले, शुभम मुल्जकर, समर्थ डन्दगे उपस्थित होते.



### पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांचा इटकळ पत्रकार संघाच्या वतीने सन्मान

**इटकळ, दि.८ डिसेंबर -**

नळदुर्ग पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या उत्कृष्ट कार्या बद्दल इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने शाल, पेन व प्रभू रामचंद्र यांची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी इटकळ ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष दिनेश सलगरे, नामदेव गायकवाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीपान कोळी, मिटके, पोलीस पाटील विनोद सलगरे यांची उपस्थिती होती.

### धाराशिवमध्ये जनावरांच्या बेकायदेशीर वाहतुकीला पोलिसांचा चाप

**धाराशिव, दि.८ डिसेंबर -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने दि.५ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता येडशी टोल नाक्यावर कारवाई करत जनावरांच्या बेकायदेशीर वाहतुकीला आळा घातला आहे. रामदास शिवाजी दराडे (वय ४०,



रा. रामेश्वर, ता. भूम, जि. धाराशिव) या आरोपीला पिकअप वाहनातून (क्र. एमएच २५ एजे ३१४६) ३ जर्सी गाई आणि एक लहान कालवड असे ४ जनावरे कत्तलीसाठी घेऊन जाताना अटक करण्यात आली.आरोपीने जनावरांना वाहनात दाटीवाटीने बांधून निर्दयतेने वागल्याचे आढळून आले. जनावरांची किंमत ४८ हजार रुपये आणि पिकअप वाहनाची किंमत ४ लाख रुपये असा एकूण ४ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ (ड) (ई), ए.एम.ए.पी. ॲक्ट कलम ५, ५ (अ), ५ (ब), ९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# मांजरा शुगर (कंचेश्वर) कारखान्याकडून गाळप केलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २७०० रुपये आज होणार जमा

### शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस पुरवठा करुन कारखान्यास सहकार्य करण्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांचे आवाहन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ डिसेंबर -**

सहकार महर्षी व महाराष्ट्राचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज कारखान्याचा गाळप हंगाम सन २०२४-२५ यशस्वीपणे चालु आहे. गुरुवारी (दि.५) अखेर कारखान्याचे गाळप ५२ हजार १०० मेट्रीक टन इतके झाले असुन १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचे पेमेंट एफआरपी पोटी प्रती मेट्रीक टन २ हजार ७०० रूपये प्रमाणे सोमवारी (दि.९) ऊस पुरवठादार शेतकरी यांचे बँक खात्यात वर्ग होणार आहे, अशी माहिती कारखान्याच्या वतीने देण्यात आले आहे.

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनानुसार शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थीक उन्नती व्हावी व त्यांचा जीवनस्तर उंचावण्याचा सार्थ हेतु विचारात घेवुन कारखान्यामार्फत विविध ऊस विकास योजना राबविण्यात येत आहेत. शेतकरी हा केंद्रबिंदु समोर ठेवून या कारखान्याची वाटचाल सुरु आहे. त्यामुळे जास्तीत जास्त या भागातील शेतकरी यांचा ऊस मांजरा कारखान्यास देण्याचा कल आहे.

मांजरा कारखान्याची वेळेवर ऊस दर शेतकजयांना अदा करण्याची परंपरा कायम ठेवत या कारखान्याने याही हंगामात ऊस पुरवठादारांना प्रति मेट्रीक टन २ हजार ७०० रूपये प्रमाणे ऊस बिलाची रक्कम सोमवारी बँकेत वर्ग करीत आहेत. त्यामुळे



या भागातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्यास जास्तीत जास्त ऊस पुरवठा करुन सहकार्य करण्याचे आवाहन कारखान्याचे जनरल मॅनेजर वाकडे यांनी केले.

## खंडोबा यात्रेनिमित्त मैलारपूरात भाविकांची अलोट गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ डिसेंबर -**

येळकोट, येळकोट जय मल्हारचा प्रचंड जयघोष करत भाविक भल्या पहाटेपासुन नळदुर्ग (मैलारपुर) येथे पहिल्या खेट्याला श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत.

श्रीक्षेत्र मैलारपुर येथील श्री खंडोबा मंदिरात पावणेदोन महिन्याच्या वास्तव्यासाठी अणदुरहुन श्री खंडोबा देवाचे आगमन झाल्यानंतर दि.८ डिसेंबर रोजी पहिल्या रविवारी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी श्री खंडोबा भक्तांनी मैलारपुरात मोठी गर्दी केली होती. भल्या पहाटेपासुन भाविक श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात दाखल झाले होते. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रम याठिकाणी पार पडत होते. अनेक भाविक मंदिरा शेजारी असणाऱ्या बोरी नदीमध्ये स्नान करुन देवाला दंडवत घालुन आपला नवस फेडत होते. त्याचबरोबर भाविकांनी मोठ्या प्रमाणात मंदिरावर खोबरे व भंडाऱ्याची उधळण केली. यामुळे संपुर्ण मंदिर परीसर भंडाऱ्याने पिवळा धमक झाला होता.खोबरे व भंडारा उधळण्याबरोबरच भाविकांनी श्री खंडोबा देवाला नैवेद्यही अर्पण केला.

भाविकांबरोबरच देवाचे वारूही मोठ्या प्रमाणात मैलारपुरात दाखल झाले होते. हलगीच्या ठेक्यावर वारू बेधुंद होऊन नाचत होते. आता दर रविवारी याठिकाणी श्री खंडोबा देवाची मिनी यात्राच भरते. श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांना श्री खंडोबा देवाचे व्यवस्थित दर्शन व्हावे यासाठी दर्शन रांगेची सोय करण्यात आली आहे.

नळदुर्ग (मैलारपुर) येथे दि.१३ जानेवारी रोजी श्री खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे त्यापुर्वी आता प्रत्येक रविवारी मैलारपुरात श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. नळदुर्ग शहर व परीसरातील भाविक श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी मैलारपुरात येतात.

## तेरखेडा येथे जिओचे 'नो' नेटवर्क : अधिकारी रेंजच्या बाहेर; नागरिक हैराण

### जिओची सर्व्हिस व्यवस्थित नसल्याने ग्राहक पोर्टच्या मार्गावर...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.८ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे मोबाईल नेटवर्क सेवेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मागील अनेक दिवस झाले गावात जिओ कंपनीची नेटवर्क सेवा व्यवस्थित मिळत नसल्याने ग्राहकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.




तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या तेरखेडा गावात व्यवस्थित नेटवर्क सेवा मिळत नाही. तर खेड्यापाड्याची काय अवस्था असेल. येथे मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसाय आहेत. त्यामुळे आजूबाजूच्या गावातील नागरिकांची गावात गर्दी असते. आजच्या तंत्रज्ञान युगात सर्वत्र कामे ऑनलाइन होत असून जगात नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे. मात्र अद्याप तेरखेडा गावात मोबाईल नेटवर्क मध्ये कसलीही सुधारणा झाली नाही. मागील दहा वर्षात जशे उंच ठिकाणांवर गेल्यानंतर कशी बशी एक काडी रेंज येत असे, तशी परिस्थिती आता गावात जिओ कंपनीची निर्माण झाली आहे. गावात चार ते पाच नेटवर्क कंपनीचे टॉवर आहेत. यात मागील अनेक दिवसांपासून नेटवर्क मार्केटमध्ये धुमाकूळ घालत असलेल्या जिओ कंपनीचे सर्वाधिक ग्राहक आहेत. पूर्वी सर्व जास्त स्पीड मिळत असल्यामुळे ग्राहकांची संख्या वाढली होती. परंतु आता या जिओ कंपनीकडून ग्राहकांना व्यवस्थित सुविधा मिळत नाही. मोबाईल धारकांना चांगली सुविधा मिळावी या हेतूने लाखो रुपये खर्च करून कंपनीने गावात टॉवर उभे केले आहे,मात्र ती नावालाच आहेत. मागील अनेक दिवस झाले गावात सतत जिओ नेटवर्कचा लपंडाव सुरू आहे. मोबाईलचे नेटवर्क गेल्यावर दिवस दिवस येत नाही. नागरिकांना एकमेकांना संपर्क साधावा लागल्यास मोठी अडचण निर्माण होत आहे. ऑनलाइन पैसे देवाणघेवाण करायची असल्यास मोठा मनस्ताप सहन करावा लाग आहे. तरीही देखील संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांचे या प्रकाराकडे दुर्लक्ष आहे.

सर्वात मोठे जिओ नेटवर्क असलेल्या टॉवरची अशी अवस्था असल्याने ग्राहक आता पोर्टच्या मार्गावर आहेत. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता अधिकारी देखील नो रेंजमध्ये आहेत.

## ट्रक विक्रीत फसवणूक, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ डिसेंबर -**

ट्रक विक्री व्यवहारात फसवणूक झाल्याची घटना उमरगा तालुक्यात घडली आहे. या प्रकरणी पंडीत शिवाजी मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पंडीत शिवाजी मोरे (वय ४६, रा. तलमोड) यांनी त्यांच्या मालकीची टाटा कंपनीची ट्रक क्र. के.ए. ५६-५७९९ ही साहेबलाल रसुल शेख (रा. इस्लामपुर, जि. बिदर, कर्नाटक) आणि विजय उर्फ विजयकुमार शिवाजी जाधव (रा. तुरोरी, ता. उमरगा) यांना ५ लाख ८५ हजार ७८९ रुपयांना विकली होती.

याप्रकरणी मोरे यांनी उमरगा पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी भादंवि कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## मुबलक पाणीसाठा असतानाही कळंबकरांची पाण्यासाठी भंटकती

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.८ डिसेंबर -**

धरण उशाला आणि कोरड घशाला... अशी परिस्थिती कळंबची झाली असून, धनेगाव धरणामध्ये मुबलक पाणी साठा असतानाही कळंब शहराला चार ते पाच दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने, नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. व पाणी विकत घेऊन आर्थिक दंड सहन करावा लागत आहे. याकडे त्वरित लक्ष न दिल्यास आंदोलन करण्याचा इशारा मा. नगरसेवक सतीश टोणगे यांनी दिला आहे.

मुख्याधिकारी नगरपरिषद कळंब यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कळंब येथे पाणीपुरवठा करणाऱ्या धनेगाव धरणात पाण्याचा मुबलक साठा असतानाही सध्या चार ते पाच दिवसाला पाणीपुरवठा होत आहे. बऱ्याच भागातील पाईपलाईन लिकेज असल्याने नळाला घडूळ व पिवळे पाणी येत आहे. त्यामुळे रोगराई होण्याची शक्यता आहे. धरण उशाला आणि कोरड घशाला, अशी परिस्थिती कळंबची झाली असून, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. पाणीपुरवठा होत नसल्याने पाणी विकत घेण्याची वेळ येत आहे. गांधीनगर, सावरगाव, १०१ नगर, बाबा नगर, मार्केट यार्ड, आदी भागात पाणी येत नाही. तसेच शहरातील स्वच्छतेकडे ही दुर्लक्ष आहे. जागोजागी कचऱ्याचे



निघाले पडलेले आहेत. विद्युत विभागात लागणारी विद्युत साहित्य नसल्याने बऱ्याच भागात अंधाराचे साम्राज्य पुसले आहे. पाणी विद्युत स्वच्छता याकडे तात्काळ लक्ष न दिल्यास, तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मा. नगरसेवक सतीश टोणगे यांनी दिला आहे.

या निवेदनावर सतीश टोणगे, शुभम राखुंडे, दिलीप शिंदे, किरण राजपूत, अजित गुरव, राजाभाऊ गरड, पापा काटे, पंकज दीक्षित, संजय घुले, गजानन लोकरे आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## श्री तुळजाभवानी मंदिराच्या विकास कामांची आढावा बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ डिसेंबर -**

प्रभारी जिल्हाधिकारी मैनक घोष यांनी तुळजाभवानी मंदिर विकासकामाची आढावा बैठक श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान कार्यलय, तुळजापूर येथे घेतली.



यावेळी त्यांनी मंदिर संस्थानच्या निधीमधून होत असलेल्या विकास कामांच्या बाबतीत विविध टप्प्यांमध्ये होणाऱ्या विकासकामांबद्दल संपूर्ण माहिती जाणून घेऊन पुरातत्व विभाग, मंदिर प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदारांना सूचना दिल्या. तसेच दोन्ही महाद्वारांचे स्ट्रक्चरल ऑडिट लवकरात लवकर पूर्ण करून अहवाल सादर करण्याविषयी सुचना दिल्या. या बैठकीस तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने, तुळजापूर नगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्रीकांत खाडे, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे

### संबंधीत कंत्राटदारांना मार्गदर्शक सुचना...

स्थापत्य अभियंता राजकुमार भोसले तसेच संबंधित कंत्राटदार साईप्रेम कन्स्ट्रक्शन्स व सवाणी कन्स्ट्रक्शन्सचे प्रतिनिधी उपस्थित होते. पुरातत्व विभाग संभाजीनगर विभागाचे सहाय्यक संचालक हे या बैठकीस ऑनलाइन मीटिंगद्वारे उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

आमचे अशिल सौ. नम्रता नरेंद्र नलावडे, रा. बाळकेश्वर नाका कुर्डुवाडी रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापुर यांनी दिलेल्या माहीतीवरुन व जाहीर नोटीस देण्यास सांगितलेवरुन तमाम जनतेस विशेषतः धाराशिव जिल्हयातील व परंडा तालुक्यातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आसु, ता. परंडा येथील जमीन गट नं. ८३ पैकी ०१ हे ०० आर, आकार ०२ रु ९६ पैसे, ज्याची चतु:सिमा पुर्वेस - संतोष कैलास उमाने, चंद्रकांत कैलास उमाने, विष्णु कैलास उमाने यांची जमीन, पश्चिमेस शरद आण्णासाहेब गायकवाड यांची जमीन, दक्षिणेस गट नं.८३ मधील शेतकऱ्यांना येण्याजाण्यासाठीचा रस्ता व चंद्रकांत तुकाराम खुने यांची जमीन उत्तरेस बावकर व काळे यांची जमीन, येणेप्रमाणे चतु:सिमेआतील मिळकत, त्यामधील दगड, माती, झाडे, झुडपे व इतर तदंगभुत वस्तुसह संपुर्ण मिळकत..... वर वर्णन केलेली मिळकत ही श्री. शंकर मगरधन इतापे यांच्या मालकी वहिवाटीची आहे, तसेच महसुल दप्तरी व ७/१२ पत्रकी त्यांचे नांवाची मालक म्हणुन नोंद आहे. वर नमुद मिळकत ही श्री. शंकर मगरधन इतापे यांनी आमचे अशिलास निर्वेध व निजोखमी असल्याचे सांगुन तसेच सदर मिळकतीचे संदर्भाने कोणाचेही हक्क व अधिकार नसल्याचे सांगुन आमचे अशिलाबरोबर व्यवहार केलेला असुन दिनांक ०६/१२/२०२४ रोजी तसा इसारपावतीचा दस्त आमचे अशिलांचे हक्कात नोंदवुन दिलेला असुन आमचे अशिलांनी दस्तात नमुद केल्याप्रमाणे इसार म्हणुन रक्कम रुपये १,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार रुपये) हे साक्षीदारासमक्ष दिलेले आहेत.

तरी सदरील मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्यावर पुराव्यासह लेखी आक्षेप दाखल करावा, मुदतीनंतर आमचे अशिल सदर मिळकतीचे मुळ मालकाकडुन खरेदीपत्रक करुन घेतील, त्यानंतर येणारा कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप आमचे अशिलाचे न्याय हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली.

तर्फे
दिनांक :- ०८/१२/२०२४ आमचे अशिल

सोलापूर तरुण भारत

**धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट नेमणे आहेत**

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-२ (कमिशनवर)
तेर, ढोकी, अंबेजवळगे, कसबे तडवळे, पाडोळी (आ.), कनगरा, बेंबळी, पाटोदा, केशेगाव, वडगांव (सि.), पळसप, जागजी, पोहनेर, जुनोनी, कोंड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर शहर, तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, अपसिंगा, काक्रांबा, आरळी (बु.), किलज, चिकुंद्रा, जवळगा, वाणेगाव, वडगाव (देव), सलगरा, वागदरी, गुळहळ्ळी, निलेगाव, सिंदगाव, कुन्सावळी, सलगरा (दि.), होर्टी.

**लोहारा तालुका :** लोहारा शहर-तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, नागराळ, एकोंडी, सास्तुर, तावशीगड, सालेगाव, हराळी, जेवळी, आष्टा, भोसगा, अचलेर, फणेपुर.

**उमरगा तालुका :** शहर प्रतिनिधी, पेठसांगवी, नारंगवाडी, नाईचाकुर, समुद्राळ, बेटजगळगा, कलदेव (लिं), कोराळ, बलसुर, येणेगुर, दाळींब, सुंदरवाडी, आलुर, बेळंब, वरनाळवाडी, कदेर, औराद, खसगी, बेडगा, डिग्गी, मळगी, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, गुगळगाव, माडज, त्रिकोळी, एकूरगा, जेकेकुर, बेटजवळगा.

**कळंब तालुका :** शहर प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, मोहा, मस्सा, सापनाई, चोराखळी, माळकरंजा, निपाणी, पाडोळी (ना.), रायगव्हाण, रांजणी, शिरपूर (अ), शिराढोण, नागुलगाव, करंजकल्ला, लोहटा (पू), डिकसळ, इटकूर, बाहुला, खोदला, कन्हेरवाडी, तांदूळवाडी.

**वाशी तालुका :** तालुका प्रतिनिधी, पार्डी, कन्हेरी, सरमकुंडी, इझोरा, घाटनांदूर, चांदवड, अजनसोंडा, गिरवली, पारगाव, हातोला, फकाबादवाडी, जवळका, पारा, सेलू, पिंपळगाव (लिं), दसमेगाव, सोनारवाडी, मांडवा, सारोळा (मां), गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, ढगप्रिंप्री, आसू, कात्राबाद, सरणवाडी, हिंगणगाव (ब्रु), दहिटणा, खासापूरी, जवळा, जकेप्रिंप्री, सोनारी, रोसा, डोंजा, इनगोंदा, शेळगांव, चिंचपूर (बु), अनाळा, रोहकल, पांढरेवाडी, बावची, घारगाव.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, हाडोंग्री, वाकवड, सोनगिरी, सुकटा, देवळाली, माणकेश्वर, वांगी (ब्रु) अंतरगाव, चिंचपूर, वालवड, अंभी, अंतरवली, लांजेश्वर, निपाणी, ज्योतीबाची वाडी, ईराचीवाडी, पाथरूड, पाटसांगवी, अंतरगाव, चुंबळी, पखरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.१५ डिसेंबर २०२४ पर्यंत संपर्क साधावा.

: कार्यालय पत्ता :
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा कार्यालय,
ॲड. मसलेकर यांचे निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.
मो.नं. ९३७३४३८३५२ / ८४२१४८९७२०

# इव्हिएम व व्हिव्हिपीटी एकाही मताचा फरक नाही ; जिल्हाधिकारी राऊत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**

मतमोजणी प्रक्रिये दरम्यान भारत निवडणूक आयोगाच्या सूचनाप्रमाणे प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील पाच केंद्राच्या ईव्हीएम मशीन वरील उमेदवार निहाय प्राप्त मतांची आकडेवारी ही व्हीव्हीपॅटशी जुळते का, याची तपासणी केली जाते. लॉटरी पद्धतीने ही केंद्राची निवड असते. जिल्ह्यातील लोकसभेच्या ३० व विधानसभेच्या ४५ अशा एकूण ७५ केंद्राची मतमोजणी बिनचूक असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली आहे.

लॉटरी पद्धतीनुसार केंद्राची निवड सर्व उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या समक्ष चिठ्ठी काढून केली जाते. तर मोजणीची प्रक्रिया निवडणूक निरीक्षकांच्या पुढे केली जाते. हे निवडणूक निरीक्षक वेगवेगळ्या राज्यातील वरिष्ठ सनदी अधिकारी असतात. प्रत्येक वेळी निवडणूक संपल्यानंतर ही प्रक्रिया पार पाडली जाते. नांदेडमध्ये देखील ही प्रक्रिया पार पाडली गेली आहे.या प्रक्रियेमागील उद्देश हा सर्व ठिकाणच्या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मधील उमेदवार निहाय प्राप्त मतदानाची आकडेवारी अचूक असल्याची खात्री पटविण्यासाठी खातरजमा प्रक्रिया म्हणून केली जाते.

मतमोजणी दरम्यान, प्रत्येक विधानसभा मतदारसंघ क्षेत्र निहाय ५ व्हीव्हीपॅट ( VVPT ) मधील चिठ्ठया (slips ) प्रत्यक्ष मोजल्या जातात. त्यांची इहीएम ( EVM² ) मधील मतांसोबत पडताळणी केली जाते. या ५ केंद्रांची निवड लॉटरी पद्धतीने सर्व उमेदवार मतमोजणी प्रतिनिधी यांचे समक्ष चिठ्ठी काढून होते. ही प्रक्रिया निवडणूक निरीक्षक यांचे समोर होते. त्यानंतर व्हीव्हीपॅट चिठठी (VVPT slips ) मतमोजणी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत मोजल्या जातात.

सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीसाठी नांदेड जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदार संघातील प्रत्येकी ५ प्रमाणे ४५ मतदान केंद्रांची व्हीव्हीपॅट (VVPT) पडताळणी करण्यात आली असून सर्व ४५ ठिकाणी व्हीव्हीपॅट(VVPT ) व इव्हीएम कंट्रोल युनिट (EVM² CU) यातील उमेदवार निहाय मतांची आकडेवारी पूर्णतः जुळली आहे. तसेच लोकसभा पोट निवडणुकीसाठी लोकसभेतील ६ विधानसभा क्षेत्रातील प्रत्येकी ५ प्रमाणे ३० मतदान केंद्रांसाठी व्हीव्हीपॅट(VVPT ) पडताळणी करण्यात आली असून सर्व ३० ठिकाणी व्हीव्हीपॅट(VVPT ) व इव्हीएम कंट्रोल युनिट (EVM² CU) यातील उमेदवार निहाय मतांची आकडेवारी पूर्णतः जुळली आहे. विधानसभा मतदारसंघातील ज्या ठिकाणी ईव्हीएम वरील इलेक्ट्रॉनिक काउंटिंग आणि व्हीव्हीपॅट मधील चिठ्ठ्या यांची मतदान संख्या तपासण्यात आली आहे ती केंद्र पुढीलप्रमाणे आहे.

**विधानसभा क्षेत्र**

किनवट मधील केंद्र क्रमांक १५१ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निचपुर, २५८ धानोरा, १३वासरामटंडा, १७४ मारेगाव खालचे, ११२ मोहडा या केंद्रांचा समावेश आहे. हदगाव विधानसभा क्षेत्रातील २८ वरुला, ११७ पळसा, १२८ वाटेगाव, २१९ कंजरा, ३३७ (बु), रोडगी येथील मतदान केंद्रांचा समावेश आहे. भोकर विधानसभा क्षेत्रातील १३९ पाणीपुरवठा विभाग नवीन समाज मंदिर, १३७ जवाहर भवन हे भोकर शहरातील, तर ३०० नांदा बुद्रुक,२९५खडकी, ८२ रेनापुर, आदी पाच केंद्रांचा समावेश आहे. नांदेड उत्तरमध्ये ४७ पिंपरी महिपाल, २१७ किशोर नगर येथील विद्या विकास पब्लिक स्कूल मतदान केंद्र, २२५ ब्रह्मसिंग नगर, इमरान कॉलनीतील इकरा उर्दू हायस्कूल,३१७ हैदरबागमधील एन एस डब्ल्यू स्कूलचा ३२५ समावेश आहे.

नांदेड दक्षिणमध्ये २० सफा उर्दू प्रायमरी स्कूल, ३३ शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, ९९ गांधी राष्ट्रीय हिंदी विद्यालय, १५७ जिल्हा परिषद प्रायमरी शाळा पुणे गाव, २४७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुपा आदी केंद्रांचा समावेश आहे. लोहा मतदार संघामध्ये २९२ धानोरा कवठा, लोहा येथील १३५ जिल्हा परिषद सी पी एस मुलींची शाळा,२४८ कटकळबा, ६४ आलेगाव या केंद्रांचा समावेश आहे. नायगाव मधील १०७ हातनी, ९७ बारबदा,२५ बिटनाळ, २०७ रत्नाळी, १६२ इकलीमाल या केंद्रांचा समावेश आहे. देगलूर मध्ये ० ५ तोरणा, ० ३७ बेलकुनी बुद्रुक, २९१ वलग,३०२ मारखेल, ३२५ हनेगाव या मतदान केंद्राचा समावेश आहे. मुखेड मध्ये ७२ खैर कवाडी ८७ बेटमोगरा १६६ गुरुदेव विद्या मंदिर मुखेड २६२ झेडपी प्रायमरी स्कूल किसान तांडा ३१० झेडपी प्रायमरी स्कूल वाळंकी आदी मतदान केंद्रांचा समावेश आहे.

**लोकसभा क्षेत्र**

तर लोकसभा मतदारसंघासाठी विधानसभा क्षेत्र निहाय पुढील मतदान केंद्राची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये भोकर मतदार संघातील अर्धापूर येथील केंद्र क्रमांक ४१, नागापूर येथील केंद्र क्रमांक १६१ मुखेड येथील केंद्र क्रमांक २३९ दौर येथील केंद्र क्रमांक २८७ वाडी मुक्ताजी येथील केंद्र क्रमांक ३२१ चा समावेश आहे. नांदेड उत्तर मधील राष्ट्रमाता स्कूल केंद्र क्रमांक ३५ हेरिटेज इंग्लिश स्कूल केंद्र क्रमांक ११८ ऑक्सफर्ड इंटरनॅशनल केंद्र क्रमांक १६४ उर्दू शाळा क्रमांक ३२० कुडवाई नगर येथील माध्यमिक मुलांची शाळा ३४६ आदींचा समावेश आहे . नांदेड दक्षिण मधील वॉटर सप्लाय ऑफिस केंद्र क्रमांक ९० तिला रोड येथील शाळा क्रमांक १४५ जिल्हा परिषद प्रायमरी शाळा वासरानी केंद्र क्रमांक १९० कुसुमताई शाळा केंद्र क्रमांक २०७ सोनखेड येथील केंद्र क्रमांक २९३ चा समावेश आहे.

## संक्षिप्त वृत्त

### बासर येथे दत्त जयंती उत्साहास प्रारंभ

**धर्माबाद**-श्री गुरुमंदीर नागपुर प्रणित श्री नरसिंह सरस्वती सायंदेव सेवा समिती बासर आयोजित श्र दत्त जयंती उत्साहव वर्ष तिसरे निमित्ताने श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह दि ७ डिसेंबर ते १३ डिसेंबर या कालावधीत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती व्यवस्थापन समिती श्री नरसिंह सरस्वती सायंदेव सेवा समिती बासर यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना दिली.



श्री नरसिंह सरस्वती आणि सायंदेव सेवा समिती श्री क्षेत्र बासर यांच्या वतीने धर्मभास्कर प.पु. सदगुरुदास महाराज यांच्या प्रेरणेने जीर्णोद्धारीत झालेल्या श्री दत्त मंदिर व श्री दत्तधाम पारायण कक्ष येथील श्री दत्त मंदीरात ७ डिसेंबर ते १५ डिसेंबर प्रयंत श्री दत्त जयंती उत्साहवा प्रित्यर्थ विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार सायंकाळी संजय जोशी यांचा भक्ती गितांचा कार्यक्रम, रविवारी दत्त नामाचा महिमा कृष्णकांत लव्हेकर व संच, सोमवारी भजन संध्या भजनी मंडळ वणी, मंगळवारी प्रवचण सेवा, बुधवारी प्रवचण सेवा प्रवचनकार प्राध्यापक मुकुंद मुळे चैत्यन्य उपासणा मंडळ नांदेड, गुरुवारी सुश्राव्य किर्तन किर्तनकार हभप श्री शिंदे महाराज, शुक्रवारी सुश्राव्य किर्तन बालकिर्तणकार कुमारी रेवा प्रशांत जोशी, शनिवार श्र ना रुद्राभिषेक व श्री चा पालखी उत्सव श्री दत्त जन्म सोहळा उपवास प्रसाद सकाळी आठ ते साडेदहा, दुपारी बारा वाजता, दुपारी एक ते तिन, रविवारी काल्याचे किर्तन किर्तनकार भालचंद्र सरदेशपांडे, तसेच महाप्रसाद दुपारी बारा ते तिन सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम काकडा आरती व महापुजा, दररोज सकाळी साडे सहा ते आठ पर्यंत,उपवसना व आरती सायंकाळी सात ते आठ पर्यंत. दि १४ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता श्र दत्तधाम बासर मंदीरातुन श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांची पालखी नगर प्रदक्षिणा निघेल. उपासक भक्तांनी मंगल वेशात उपस्थितीत राहावे पालखीच्या मार्गातील भावीकांनी आपल्या घरासमोर सडा समर्जन व रांगोळ्या काढुन पालखिचे भव्यदिव्य स्वागत करावे. टाळ, मृदंग, टिपर्या, भजने इत्यादी रम्य वातावरणात निघणाऱ्या या पालखी मिरवणुकित प्रसन्नचित्ताने सहकुटुंब सहपरिवार सहभागी व्हावे. या शिवाय सप्ताहा मध्ये रात्री च्या वेळी भजन व जागरणाचे कार्यक्रम होतील आसे संयोजकाने उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# एकंबा येथील पाणी पुरवठ्याचे काम निकृष्ट

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. ०८ डिसेंबर**

तालूक्यातील एकंबा येथे जलजिवन मिशन अंतर्गत चे पाणी पुरवठ्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असून, ठेकेदाराकडून मनमानी पद्धतीने निकृष्ट दर्जाचे काम जनतेच्या माथी मारण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाची जायमोक्यावर सक्षम अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून ठेकेदारांवर कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

एकंबा येथे कायमस्वरूपी पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडून लाखो रूपयांचा विकास निधी मंजूर झाला. या प्राप्त निधीतून गेल्या काहिं दिवसांपासून अतिशय कासव गतीने या पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू आहे. या कामात मोठी अनियमितता असून ठेकेदाराने प्रशासकीय यंत्रनेला मॅनेज करून मोठ्याप्रमाणात बोगस व निकृष्ट दर्जाचे काम तेहि निकृष्ट दर्जाचे उरकविले जात आहे. या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे ,भविष्यात भोगावे लागणाऱ्या परिणामांमुळे जनता त्रस्त झाली आहे. जलजिवन च्या कामात पाईपलाईन करण्यासाठी अंतर्गत रस्ते खोदण्यात येणार असल्याने पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य पसरणार आहे. आणी नागरीकांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागणारा आहे. चालू असलेल्या या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी होणे क्रमप्राप्त ठरत असून, जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी एका सक्षम अधिकाऱ्यांमार्फत व तसेच एक विशेष समिती स्थापन करण्यात यावी. यासमितीसह क्वालीकंट्रोल मार्फत चौकशी करून ठेकादाराचे नाव काळया यादीत टाकून,या कामात मोठी अनियमितता असतांनाही सुधारीत मूल्यांकन करून ठेकेदारास अभय देणाऱ्या शाखा अभियंता, उप अभियंता व उपरोक्त दोषींवर कारवाई चा बडगा उगारावा. अशी मागणी एकंबा वाशियं जनतेतून पुढे आली आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठात संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ डिसेंबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या स्वागत कक्षामध्ये दि. ८ डिसेंबर रोजी संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०० वी जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सहा. अधीक्षक हनुमंतअप्पा डोंगरे, संभा कांबळे, रामदास खोकले, बबन हिंगे यांच्यासह प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# शरद पवारांच्या चुकीची पुनरावृत्ती फडणवीसांनी करू नये- राजकीय वर्तुळातून सुर

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.०८ डिसेंबर**

२००४,२००९ व २०१४ अशा सलग तीन टर्म निवडणुका जिंकुणही तत्कालीन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार प्रदीप नाईक यांना किनवटसारख्या बंजारा व आदिवासी बहुल मागासलेल्या भागातील मतदारसंघातून मंत्रीपद न देण्याची जी घोडचूक राकाँचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी भूतकाळात केली होती ती चुक किनवट विधानसभेत दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार भीमराव केराम यांच्या बाबतीत भाजपाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करु नये! असा सुर राजकीय वर्तुळातून ऐकावयास मिळत आहे.

२०१९ निवडणुकीत राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भीमराव केराम यांना निवडून द्या; मी मंत्रिपद देऊन नामदार करुन किनवट माहूर मतदारसंघाला लाल दिव्याची गाडी देतो! व २०२४ निवडणुकीत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनीच किनवट मतदारसंघातील रखडलेल्या विकासाच्या अनुशेषाला आ.केराम यांनी चालना देण्याचे महत्त्वाचे काम केले. त्यांनी दिलेल्या चालनेस गती देण्याचे काम मी करतो! असे किनवटकर व माहूरकरांना प्रचार सभेत आश्वासन दिले होते. आता या आश्वासनाची पूर्तता करण्याची योग्य वेळ आली आहे. रखडलेल्या उर्वरित विकासाच्या अनुशेषाच्या चालनेस गती देण्यासाठी डबल इंजिनची गरज असून, ती प्राप्त करण्यासाठी आ.भीमराव केराम यांचा राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश झालाच पाहिजे अशी सर्वसमावेशक मागणी या मतदारसंघातील जनतेतून जोर धरू लागली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनभावनेचा आदर करत आ.केराम यांना नामदार करण्याचा जनतेला दिलेला शब्द पाळावा अशी अपेक्षा दोन्ही तालुक्यातील भाजपा कार्यकर्त्यांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई येथील विधानभवनाच्या विधीमंडळात सर्वांचे लाडके दादा किनवट माहूर विधानसभेत सलग दुसऱ्यांदा निवडून आलेले लोकाभिमुख आमदार भीमराव केराम यांनी विधानसभा सदस्यत्वाची अर्थात आमदारकीच्या गोपनीयतेची शपथ घेतली.गत २०१९ विधानसभा निवडणुकीच्या किनवट येथील एका प्रचार सभेत बोलताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मतदारांना तुम्ही मला भीमराव केराम यांना आमदार म्हणून निवडून द्या! मी त्यांना मंत्रीपद देऊन लाल दिव्याची गाडी देतो असे खात्रीपूर्वक आश्वासन दिले होते.मतदारांनी निवडून देखील दिले, परंतु, दुर्दैवाने तत्कालीन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री होण्याचा सत्तामोह उफाळून आल्याने राज्यात सर्वात जास्त संख्येने आमदार निवडून येऊनही भाजपला विरोधी बाकावर बसावे लागले.परिणामी आश्वासित आमदार भीमराव केराम यांना मंत्रिपद मिळण्याची संधी उद्धव ठाकरे यांच्या राजहट्टयोगामुळे हुकली.अडीच वर्षानंतर सत्तापालट होऊन भाजप-शिवसेना व पुढे राष्ट्रवादी यांचे महायुतीचे सरकार स्थापन झाले. परंतु बदलेल्या राजकीय समीकरणामुळे आ.केराम यांचे मंत्री होण्याचे स्वप्न वास्तवात न उतरता स्वप्नच राहिले. २०२४ च्या निवडणुकीतही केराम यांना निवडून देण्यासाठी किनवट येथीलच प्रचार सभेत यावेळेसचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याच आशयाचे ठोस आश्वासन मतदारांना दिले. झाले केराम हे दुसऱ्यांदा निवडून आलेत. विशेष म्हणजे आता भाजपाचेच सर्वात जास्त आमदार निवडून येऊन मुख्यमंत्री देखील महायुतीकडून भाजपचाचअसल्याने या पंचवार्षिक कार्यकाळात तरी आ.केराम यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रीपद देऊन आदिवासी बहुल किनवट- माहूर मतदारसंघास लाल दिव्याची गाडी देऊन न्याय द्यावा. अशा जनभावना तिव्रतेने जोर धरू लागल्या आहेत. २००४, २००९ व २०१४ अशा तीनही निवडणुकीत निवडून येत विजयाची हॅट्रिक साधलेले तत्कालीन राष्ट्रवादीचे आमदार प्रदीप नाईक (जाधव) यांनी एकेकाळी नांदेड जिल्हाचेच नव्हेतर हिंगोली लोकसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले होते.परंतु, तत्कालीन महाविआ सरकारने किंबहुना प्रदीप नाईक ज्यांचे अत्यंत जवळचे विश्वासू समजले जातात. ज्यांना ते आपले राजकीय गुरू, गॉडफादर मानतात. ते राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीसुद्धा आदिवासी व बंजारा बहुल समाजाचे प्राबल्य असलेल्या किनवट-माहूर सारख्या मागासलेल्या भागातील मतदारसंघातून सलग तीन टर्म निवडून आलेले आमदार प्रदीप नाईक यांच्या या भक्कम कामगीरीची दखल घेऊन मंत्रिमंडळात स्थान देण्याचे सौजन्यही दाखविले नसल्याने किनवट माहूर हा मतदारसंघ एका संभावित मंत्रिपदास मुकला.परिणामी एक वेगळाच निर्णायक संदेश गेला कि, बंजारामतांच्या पाठबळावर निवडणुकीत निवडून आलेल्या प्रदीप नाईक यांना पक्षश्रेष्ठी भाव देत नाही तर,याच धर्तीवर पुसद, दिग्रस मतदारसंघात निवडूण आलेल्या बंजारा समाजातील आमदारांना मंत्रिमंडळात नियमित स्थान मिळते. परिणामी,२००४ ते २०१९ असे सलग तीन टर्म पंधरा वर्षे तत्कालीन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा आमदार राहूनही तत्कालीन आ.प्रदीप नाईक यांना पंधरा वर्षांत निधी मिळवून किनवट विधानसभा मतदारसंघात भरीव असा विकास साधता आला नाही. आता २०२४ विधानसभा निवडणुकीत या गोष्टीची जाणीव झाल्यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांना पश्चातबुद्धी सुचल्याने प्रचार सभेत राकाँ. शप.च्या स्टार प्रचारकांनी प्रदीप नाईक यांना मंत्रिपद देण्याचे गाजर दाखवून मतदारांना मते मागितली होती.या निवडणुकीत प्रदीप नाईक यांच्या विजयासाठी बंजारा समाज कमालीचा एकवटला होता.परंतु, आजकालच्या राजकारणात चलती का नाम गाडी,जो चालू गाडी में बैठ गया वह सबसे बडा खिलाडी और जो बंद गाडी का इंतजार करता रहा वह सबसे बडा अनाडी अशी उगवत्या सूर्याला नमस्कार करणारी वृत्ती राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांची झाली असल्याने व निवडणुका निव्वळ जातील समिकरणावर लढल्या जात असल्याने प्रदीप नाईक यांना मानणारा बंजारा जरी एकवटल्याचे दिसून आले तिथे त्यांना मानणारा अठरापगड जातींच्या समुहातील चाणाक्ष मतदारांनी केंद्रात एनडीए भाजपचे सरकार आहे हे ओळखून व त्याच आधारावर राज्यातील संपलेल्या पंचवार्षिक कार्यकाळात महायुतीच्या सरकारने राबविलेल्या विविध जनकल्याणकारी योजनेकडे आकृष्ट होऊन निवडून येणारा आमदार म्हणून भीमराव केराम यांचे हात बळकट केले.हे या निवडणुकीच्या निकालावर नजर टाकल्यास दिसून येते. आता दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार भीमराव केराम यांनी गत पंचवार्षिक कालावधीत मतदारसंघात कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणत रखडलेल्या विकासकामाला दिलेल्या चालनेला गती देण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आ.केराम यांना आपल्या मंत्रिमंडळात स्थान देऊन आदिवासी विकास अथवा इतर एखाद्या खात्याचे मंत्रीपद देऊन केराम यांना निवडून द्या लाल दिव्याची गाडी देतो! हे किनवटकर व माहूरकरांना निवडणुकीत दिलेले आश्वासन पूर्ण करावे अशा जनभावना उफाळून येत आहेत. तीन टर्म निवडणुकीत निवडून येणाऱ्या तत्कालीन आमदाराला म्हणजेच प्रदीप नाईक यांना मंत्रिमंडळात मंत्री न करण्याची जी चुक महाविआचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शरदचंद्र पवार यांनी करून किनवट-माहूर सारखा आपला राष्ट्रवादीचा मजबूत बालेकिल्ला भाजपचा हवाली करत भाजपाचा विजयगड केला. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने भूतकाळात केलीली घोडचूक सुधारण्याची नामी संधी महायुतीच्या भाजपकडे किनवट विधानसभेत दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार भीमराव केराम यांच्या रूपाने चालून आली असून,या संधीचा लाभ आमदार भीमराव केराम व पक्षश्रेष्ठी कशाप्रकारे उचलतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# किनवट येथे अयप्पा स्वामी रथउत्सव शोभायात्रा उत्सहात

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०८ डिसेंबर**

अयप्पा स्वामी दीक्षा धारकांनी आज सकाळी आठ वाजता आय्यप्पा स्वामी मंदिरापासून भव्य अशी रथउत्सव शोभायात्रा किनवट शहरातून काढण्यात आली यावेळी शहर वासीयांनी विविध ठिकाणी फुलांची उधळण करुन उत्स्फूर्त स्वागत केले. सकाळी सात वाजता अय्यप्पा स्वामी मंदिरातून दीक्षाधारी भक्तांनी फुलांनी सजवीलेल्या रथातुन शोभा यात्रा काढली. स्वामी शरणमय्याप्पा आणि अय्यप्पा स्वामीचा जयजयकार करीत शोभायात्रा निघाल्यानंतर महिला भगिनींनी आपल्या घरासमोर सडा टाकुन रांगोळ्या काढून फुलांच्या पायघड्या टाकल्या रथाची पूजा अर्चना केली फुले उधळून स्वागत केले.



विठ्ठल मंदिर मार्कंडेश्वर मंदिर श्रीराम मंदिर हनुमान मंदिर गजानन महाराज मंदिर श्री साईबाबा मंदिरातही या रथयात्रेचे स्वागत करण्यात आले तर दुपारी बारा वाजता ही रथयात्रा पैनगंगा तीरावर आली आयप्पा स्वामी भक्तांनी पेनगंगेत स्नान पूजा करून ही शोभायात्रा आयप्पास्वामी मंदिरात परत आल्यानंतर पूजा महाआरती नैवेद्य दाखवल्यानंतर भिक्षा म्हणजेच महाप्रसादाचा कार्यक्रमानंतर या शोभायात्रीची सांगता झाली या शोभायात्रेत आय्याप्पा स्वामी भक्त आणि किनवट शहरातील भाविक सहभागी झाले होते महिला भगिनींनी ठिकठिकाणी पूजा करीत या रथयात्रेचे स्वागत केले १४ जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात मंडळ पूजा पडी पूजा इरमुडी अशा विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे सकाळी पाच वाजता आणि सायंकाळी सात वाजता अय्यप्पा स्वामींची महापूजा आणि आरती करण्यात येते तर दुपारी एक वाजता भिक्षा म्हणजे महाप्रसादाचा दररोज कार्यक्रम असतो.

# ग्राम महसूल अधिकारी तलाठी संघटनेच्या लोहा तालुकाध्यक्षपदी भूमेश्वर विभूते याची निवड

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०८ डिसेंबर**

लोहा तालुका तलाठी संघटनेच्या म्हणजे ग्राम महसूल अधिकारी संघटनेच्या लोहा तालुकाध्यक्ष पदी भुमेश्वर गोविंदराव विभूते याची एकमताने निवड झाली आहे.तहसीलदार विठ्ठल परळीवर यांनी निवडी बद्दल सत्कार केला.

महसूल विभागात तलाठी या पदाचे नाव आता ग्राम महसूल अधिकारी असे झाले आहे.तलाठी (आता ग्राम महसूल अधिकारी) संघटनेचे लोहा तालुकाध्यक्ष मारुती कदम हे होते त्याची बदली झाल्यामुळे रिक्त जागेवर नव्याने निवड करण्यात आली. गोरगरीब माणसांना नेहमीच मदत करणारे व भुकेलेल्या व्यक्तीला जेवण देणारे गोविंदराव विभूते याचे चिरंजीव भुमेश्वर विभुते हे अष्टुर या गावचे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आहेत. लोहा तालुका ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संघटनेच्या



अध्यक्ष पदी एकमताने निवड केली आहे. तहसीलदार विठ्ठल परळीवर यांनी भुमेश्वर विभूते याचा सत्कार केला. नायब तहसीलदार अशोक मोकले, नायब तहसीलदार पाठक, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार संदीप हाडगे तसेच बंधू राम विभूते, मंडळ अधिकारी कठारे, सुगावे, सहारे, श्रीमती पवार, श्रीमती नाशिककर, श्रीमती सुर्यवंशी, मुळजकर, नीळकंठ पांडागळे, निखील सुंदगिरवार, मोतीराम पवार, गाडे पाटील, संतोष अस्कुलकर, परशुराम जाधव, राजू इंगळे, केलास बोधगिरे, बालाजी एकाडे, शहाजी निकम, संजय मेहुनकर, संतोष जाधव, आतीक अन्सारी, राजू सानप, अजय कासले, लाडेकर, राजकुमार मुढे, गोधने, कासेवड, डी जी शिंदे, नितीन रायाजी, सोनुले, हणमंत गायकवाड, माणिक कोकरे, वर्षराणी कुणके, किर्ती रावळे, प्रीती ढेपेकर, सीमा कदम, मायादेवी गोडबोले, सिंगिता राऊत, स्वाती येडे, शामल भावसार, सीमा उजनकर, पुजा गाडे, प्रियांका बने, वंदना शिंदे, महुनकर, प्रियांका भेरवाड, माधुरी मुजाळ, वर्षा सावंत, कुशावर्ता शिंदे तसेच पत्रकार विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी महसूल कर्मचारी यांनी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

# लेंडी धरणाच्या तळभरणी व गळभरणीचे काम थांबवा

## धरणग्रस्तांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. ०८ डिसेंबर**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परीसरातील गोणेगाव येथे गेली ३२ वर्षापासुन होऊ घातलेल्या अंतरराज्य लेंडी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर पुन्हा लेंडी विभाग अन्याय करीत असल्याचे शेतकऱ्यांच्या निदर्शनास येताच शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना तळभरणी व गळभरणीचे काम बंद करण्याची विनंती २६ नोव्हेंबर रोजी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचे निवेदन देताच त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत जिल्हाधिकारी अभिजित राऊत, प्रांत अधिकारी घोगरे, देगलूर येथील उपजिल्हाधिकारी पाटील, मुखेड तहसिलदार राजेश, पाटील, लेंडी अभियंता तिडके, दाभाडे, अभियंता डोंगळीकर मॅडम, लेंडी धरण संघर्ष समिती अध्यक्ष राजू पाटील, संघर्ष समिती सदस्य संदिप पाटील अतनुरे, उमाकांत वाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गेल्या सहा महिन्यांपूर्वी लेंडी धरणावर नव्वद दिवस साखळी उपोषण करण्यात आले व त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालया समोर







आमरण उपोषण शेतकऱ्यांनी केला होता. नांदेड जिल्हाअधिकारी कार्यालयाच्या बैठकीत असे ठरले होते की धरणावरील साफसफाई करण्यासाठी संघर्ष समितीने परवानगी दिली होती. दरम्यान लेंडी विभाग साफसफाईच्या नावा खाली लेंडी प्रकल्पाचे मुळ तळभरणी व गळभरणीचे काम करण्यास सुरुवात केली आहे. बैठकीत चर्चा कशी झाली. त्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी काम न करता मुळ असलेल्या तळभरणी व गळभरणीच्या कामाला सुरुवात करून घाईघाईने धरण कोंडून शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे षडयंत्र रचले जात आहे. बुडितक्षेत्रातील शेतकऱ्यांची मुख्य मागणी म्हणजे शेतकऱ्यांचे मंजूर ६.७५ लक्ष्य पॅकेज त्वरित वाटप करावे.

१२ गावातील लोक स्थलांतरीत झाल्याशिवाय धरणाच्या मुख्य काम करू नये तळभरणी व गळभरणी आणि दरवाजाचे काम केले त्यामुळे नदीकाठावरील गावात पाणी शिरले, धरणग्रस्त प्रमाणपत्र ऐवजी एक रकमी दहा लक्ष द्यावे, मुक्रमाबाद येथील वाढीव कुटुंबाचा मावेजा द्या, २१ वर्षाच्या वरील मुलांना वाढीव कुटुंबात समाविष्ट करा, आजोबांच्या खाली नातुला वाढीव कुटुंबात न्याय द्या, वडील वारल्यानंतर घर आईच्या नावे न होता मोठ्या मुलाच्या नावाने झाले म्हणून त्याच्या इतर कुटुंबीयातील व्यक्तींना न्याय द्या, राष्ट्रीय महामार्ग जशाच्या तशे करा. ज्या कुटुंबातील व्यक्तींना मुलेच नाही तर मुली आहेत अशा मुलींना वाढीव कुटुंबात समाविष्ट करा, १२ गावातील नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, धरणग्रस्त १२ गावातील नागरिकांना महाराष्ट्र शासनाकडून नागरी सुविधा उपलब्ध झालेली नाही. अशा वरील सर्व मागण्या मान्य करून धरणाच्या तळभरणी व गळळभरणी काम बंद करावे अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करतील असा इशारा जिल्हा अधिकाऱ्यांना दिला आहे.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## चार चाकीला वाहनाला धडकून दुचाकीस्वार ठार



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ८ डिसेंबर : पैठण तालुक्यातील रांजणगाव खुरी येथील शुभम रामेश्वर अवधूत वय २१ रा रांजणगाव खुरी ता पैठण हा तरून एम एच २० एच सी ३५६० या दुचाकीने बिडकीन कडून घरी रांजणगाव खुरी कडे जात असताना गुणगुली नदीच्या पात्राजवळ चारचाकी एम एच १२ ई एम ६०१७ ला धडकून नदीच्या पात्रात जखमी अवस्थेत पडला, शुभम अवधूत याला पुढील उपचारासाठी बिडकीन येथील ग्रामीण रूग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. अपघाताची नोंद बिडकीन पोलिस ठाण्यात घेण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर, आप्पासाहेब माळी करीत आहे.

## जिप प्रशालेत पालक मेळावा संपन्न



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०८:- जिल्हा परिषद प्रशाला मुलांची पैठण येथे पालक मिळव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालाकांना मार्गदर्शन करतांना ज्ञानेश्वर वाडेकर यांनी सांगितले की आपल्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, सीओ शिक्षणाधिकारी,सर्वच शैक्षणिक दर्जा सुधाण्यासाठी प्रयत्नशील आहेत या मध्ये पालकांची भूमिका फार महत्वाची आहे पालकांनी आपल्या पाल्याच्या शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करावे स्वत:सहभागी व्हावे आपल्या पाल्याना शिक्षणासाठी सहकार्य करावे असे आव्हान केले.

तर अंकुश गाढे यांनी टार्गेट पिक प बद्दल पालकांना मार्गदर्शन करतांना सांगितले की इयत्ता ५ वी तील विद्यार्थ्यांनी दररोज रात्री ७:०० ते ८:०० दरम्यान टार्गेट पिक प ऑनलाईन पहावे व इयत्ता ८ वी तील विदयार्थ्यांनी रात्री ८:०० ते ९:०० वाजेपर्यंत ऑनलाईन पहावे व प्रत्येक रविवारी त्याच प वर चाचणी परीक्षा देखील दयावी जेणेकरून स्कॉलरशिप परीक्षा मध्ये याचा भरपूर फायदा होईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समशेर पठाण यांनी केले तर आभार प्रदर्शन दिलिप तांगडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ताराचंद हिवराळे, राजेश पाखरे,वैशाली कुटे, यास्मिन शेख,जोती बालखंडे, शेख चाँद,यांनी परिश्रम घेतले. यावेळी उमेश पल्हारे,अशोक तांबे,आबेद अवघड,अनिस कुरेशी,विर,बेग,शेख,गोधळे, इत्यादी पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

## एमजीएम'च्या प्रा. डॉ. योगिता महाजन यांच्या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

### 'थिएटर फॉर यंग माईंड्स गोल्डन मॅजिक ऑफ थिएटर पेडागॉजी' पुस्तकाचे प्रकाशन संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. ८ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्समध्ये कार्यरत असणाऱ्या प्रा.डॉ. योगिता महाजन यांच्या 'थिएटर फॉर यंग माईंड्स गोल्डन मॅजिक ऑफ थिएटर पेडागॉजी' या पुस्तकाचे प्रकाशन कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते एमजीएम ट्रस्ट कार्यालयात संपन्न झाले. या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, प्रा.डॉ.शर्वरी तामणे, प्रा. डॉ.आर.आर.देशमुख, प्रा.डॉ. कपिलेश मंगल व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, प्रा. योगिता महाजन या एक कलावंत, प्राध्यापक म्हणून सर्वांना परिचित आहेत मात्र, आता त्या लेखिका म्हणून ही आपले नावलौकिक करतील असा विश्वास मला वाटतो. नाट्य क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या तरुणाईस हे पुस्तक मार्गदर्शकाची भूमिका पार पाडेल. प्रा. महाजन यांच्या पुढील लेखन कार्यास माझ्याकडून शुभेच्छा!

'थिएटर फॉर यंग माईंड्स गोल्डन मॅजिक ऑफ थिएटर पेडागॉजी' हे पुस्तक शिक्षकांना त्यांच्या अध्यापन पद्धतींमध्ये मार्गदर्शन करणारा एक मौल्यवान स्रोत आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून योगिता महाजन यांनी सिद्धांत आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामधील अंतर अचूकपणे भरून काढले आहे आणि प्राथमिक शिक्षणामध्ये नाट्य शिक्षणाचा समावेश करण्यासाठी एक मार्गदर्शक मार्ग तयार केला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासाला चालना मिळते. हे पुस्तक शिक्षक, शिक्षणतज्ञ तसेच बाल शिक्षणासाठी नाविन्यपूर्ण दृष्टिकोन असलेल्या व्यक्तींसाठी महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन लेखिका प्रा. डॉ. योगिता महाजन यांनी यावेळी केले.

प्रा. डॉ. योगिता महाजन या अनुभवी नाट्य कलाकार आहेत. त्यांनी नाट्य शिक्षणामध्ये पीएच.डी. प्राप्त लेली असून त्यांनी परफॉर्मिंग आर्ट्स, मास कम्युनिकेशन आणि जर्नालिझममध्ये आपले पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांना भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून ज्युनियर रिसर्च फेलोशिप आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून सुवर्ण महोत्सवी फेलोशिप मिळालेली आहे. त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये यशस्वीरित्या आपले संशोधन प्रबंध सादर केले आहेत. त्या गेल्या दोन दशकापासून मुलांसोबत नाट्य क्षेत्रात काम करत आहेत. त्यांनी ६० हून अधिक नाटकांमध्ये अभिनेत्री व दिग्दर्शक म्हणून काम केले आहे.

या पुस्तकात परिचय, भारतीय शिक्षण पद्धती आणि शिक्षणामध्ये नाट्य शिक्षणाची गरज, नाट्य शिक्षणाची रचना आणि विविध विषयांमध्ये त्याचा समावेश, नाट्य शिक्षणातील नवीन रणनीती आणि त्याच्या अनुप्रयोगाचे महत्त्व: सुधारणा आणि सादरीकरण,अभ्यासक्रमामध्ये गोष्टी सांगण्याच्या विविध पद्धतींचा वापर, अभ्यासक्रमामध्ये भूमिका निर्मिती तंत्राचे महत्त्व, नाट्य शिक्षण/शिक्षणातील नाट्य या संकल्पनेचे प्रवर्तक, नाट्य शिक्षणाच्या अंमलबजावणीनंतरचे परिणाम: तथ्ये, निष्कर्ष आणि परिणाम अशी एकूण ८ प्रकरणे आहेत.

## चितेगाव रोडवर दोन वाहनांचा समोरासमोर अपघात; अपघातात २ जागीच ठार,२ जण गंभीर जखमी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ८ डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाणे हद्दीतील चितेगाव रोडवरील आर एल स्टील कंपनीच्या समोर दि ७ शनिवार रोजी रात्री दहा वाजेच्या दरम्यान दोन वाहनांचा समोरासमोर अपघात झाला असुन या अपघातात दोन जण जागीच ठार झाले आहे तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.याबाबत सविस्तर माहिती अशी कि, छत्रपती संभाजीनगर कडुन पैठण कडे अंत्यसंस्कार आटोपून घरी येत असलेल्या वाहन क्रमांक एम एच २० डी डब्लु ५२८५ या वाहनाला पैठण कडुन छत्रपती संभाजीनगर कडे जात असलेल्या वाहन क्रमांक एम एच २० जी एच ९१२६ या वाहनाने जोरदार धडक दिल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातात मयत झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव कय्युम मुंशी कुरैशी,वय.३८, रा जेएस स्पिनर स्टॉप,व दुचाकीवर सोबत असलेल्या संतोष प्रल्हाद पवार,वय.५५ वर्षे, रा मुधलवाडी असे मयत झालेल्या दोघांची नावे आहेत.पैठण वरुन राहत्या घरुन छत्रपती संभाजीनगर येथे नातेवाईकांच्या अंत्यसंस्कार कामी गेले होते.तसेच या अपघातात गंभीर जखमी झालेल्यांची नावे आकाश पुंडलिक पवार,वय.२८ वर्षे,रा.चौका ता.फुलंब्री ,व उमेश देवरे,वय.३० वर्षे,रा. पाचोरा , ता.जळगाव असे गंभीर जखमींची नावे आहेत, दोघा गंभीर जखमींवर प्रथमोपचार करुन पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे याप्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे करीत आहे.

## सोयगाव पोलीस ठाणे येथे संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ डिसेंबर : पोलीस ठाणे सोयगाव येथे संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी येथे संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी सफौ. दिलीप पवार,चंद्रकात दौड,पवन तायडे, रवींद्र तायडे,संजय सिंगल,योगेश बोखारे,कृषी भूषण तथा समाजसेवक अरुण सोहनी,राजेंद्र दुत्तोंडे,मंगेश सोहनी, सुनिल सोहनी,संतोष सोहनी आदींची उपस्थिती होती.

## गंगापुरात संत जगनाडे महाराज जयंती उत्साहात साजरी



गंगापूर दि.८ डिसेंबर:

श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची यांची ४०० वी जयंती साजरी करण्यात आली संत शिरोमणी संताजी महाराज जगनाडे यांच्या जयंतीनिमित्त गंगापूर मध्ये संताजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली.

यावेळी पत्रकार धनंजय ठोंबरे यांच्या हस्ते संताजी महाराजांना पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी कमलाकर साबणे, प्रदीप साबणे, ताराचंद साबणे, नगरसेवक ज्ञानेश्वर साबणे, नगरसेवक दत्तात्रय साबणे, राजू सोमवंशी ,नारायण सोनवणे ,कचरदास सोनवणे, रवींद्र साबणे, कैलास साबणे, विलास साबणे, गणेश लोखंडे, गणेश कर्डिले,वैभव साबणे, नानाभाऊ सोनवणे, सुधाकर टिके, संदीप साबणे, दीपक साबणे,प्रभाकर साबणे, प्रविण उचीत, बाडगुळे, बागुल, प्रेमभरे, राऊत राजू साबणे, आदी उपस्थीत होते.

## सोयगाव येथे होमगार्ड संघटनेचा ७८ वा वर्धापन दिनानिमित्त; स्मशानभूमी स्वच्छता अभियान राबवून केला होमगार्ड वर्धापन दिन उत्साहात साजरा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ डिसेंबर

सोयगाव येथील होमगार्ड पथक कार्यालय सोयगावच्या वतीने आज दि.८ रविवार रोजी महाराष्ट्र राज्य होमगार्ड संघटनेचा ७८ वा वर्धापन दिनानिमित्त सोयगाव होमगार्ड कार्यालय परिसरातील साफसफाई करण्यात आली.तसेच सोयगाव शहरातील समशानभूमी व परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते.यावेळी सोयगाव होमगार्ड पथाकाचे तालुका समादेशक अधिकारी संदीप सुरडकर, अंशकालीन लिपिक कृष्णा शेवाळकर,अंशकालीन शिपाई योगेश बोखारे यांनी सोयगाव होमगार्ड पथकातील होमगार्ड जवानांना वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.यावेळी तालुका समादेशक अधिकारी संदीप सुरडकर अशकालीन लिपीक कृष्णा शेवाळकर,अंशकालीन शिपाई योगेश बोखारे,विशाल घन,विष्णू गव्हाणे,दिपक घन,विनोद इंगळे, समाधान काळे,किरण सपकाळ,विलास भवर,दिनेश काळे,राज महंमद शेख,ज्वालासिंग बडगुजर,इमरान शेख,शांताराम मिसाळ, ज्ञानेश्वर काळे,विजय सोनवणे,संतोष घनगाव,बापू घनगाव,भीमराव दनके,बापू लव्हाळे,हिरालाल ठाकरे,अंकुर बि-हारे,विनोद इंगळे,रमेश चक्के,श्रावण मंडवे,आमोल नेरपगारे,इरफान पठाण, भास्कर गव्हाडे,अनिल आगे,शिवाजी रोकडे,रतिलाल सोनवणे,महेश चव्हाण,आमोल सोनवणे,विष्णू घनगाव,जिवन सोनवणे,सुनिल सोनवणे,शांताराम मिसाळ, संतोष घुंगरे,सुरेश कुनगर,सोमनाथ इंगळे,रावसाहेब लवटे,महिला होमगार्ड निर्मला लाड,संगीता भालेराव,सुनिता काळे,आदीसह होमगार्ड यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## हायटेक महाविद्यालयाची विद्यार्थिनी पुनम कदम हीची बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये निवड



वाळूज महानगर (प्रतिनिधी) : बजाजनगर येथील हायटेक अभियांत्रिकी महाविदयालयातून कॉम्प्युटर सायन्स ण्ड इंजि. शाखेतून उत्तीर्ण झालेली पुनम कदम हिची कॅपजेमीनी या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत सिस्टीम अॅनॅलिस्ट म्हणून निवड झालेली आहे. तिच्या या यशाबददल संस्थेचे सचिव एकनाथ जाधव, सहसचिव अमन जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

तिच्या या यशाबद्दल प्राचार्य प्रा. गोविंद एस. ढगे, आणि हायटेक अभियांत्रिकीचे मॅकेनिकल विभागाचे विभाग प्रमुख प्रा. अमोल एस. अडकिणे, सिव्हील विभागचे विभाग प्रमुख प्रा. आर एफ. सिध्दीकी, कॉम्प्युटर सायन्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. प्रताप एम. मोहिते, प्रथम वर्षीचे विभागप्रमुख डॉ. भावना पी. पिंगळे, ट्रेनिग ण्ड प्लेसमेंट विभागाचे अधिकारी प्रा. जनार्धन के. भोर, सीएसईएआयएमएल विभागाचे विभागप्रमुख प्रा. संदिप ई. इंगळे व महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी. बी.बी. जाधव, यांच्यासह प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पुनम कदम हिचे अभिनंदन केले आहे.

## रमेश दिनानाथराव नाईक यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - म.शि.प्र मंडळाचे माजी प्रशासकीय अधिकारी मेजर रमेश दिनानाथराव नाईक यांचे वृद्धापकाळाने दि.७ डिसेंबर शनिवार रोजी दुपारी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. त्यांच्यावर रविवार दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ८.०० वाजता प्रतापनगर स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, दोन मुली जावई, नातवंडे असा परिवार आहे. देवगिरी महाविद्यालयातील डॉ.मनिषा नाईक जोशी यांचे ते वडील असून प्रा.शुभांगी नाईक कुलकर्णी तसेच निवृत्त तंत्र शिक्षण संचालक डॉ.महेश शिवणकर यांचे ते सासरे होत.

## एमजीएमच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर सुवर्ण कामगिरी



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे जिम्नॅस्टिक खेळाडू शुभम सुनिल सरकटे आणि ऋत्विज देव यांनी नुकत्याच मिरज (सांगली) येथे झालेल्या ३० व्या राज्यस्तरीय एक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत यशस्वी कामगिरी केली आहे. त्यांनी अनुक्रमे २ सुवर्ण, १ रौप्य पदक आणि २ रौप्य, १ कांस्यपदक पटकावित स्पर्धेमध्ये विजय प्राप्त केला आहे.

त्याचप्रमाणे चेंबूर (मुंबई) येथे झालेल्या २४ व्या राज्यस्तरीय एरोबिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत साक्षी मकरंद डोंगरे हिने सुवर्ण पदक पटकवित विजेते पदावर आपले नाव कोरले आहे. या सर्व विजेत्या खेळाडूंनी गुजरात आणि जम्मू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात आपले स्थान निश्चित केलेले आहे. या खेळाडुंना विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रा.प्रविण रावण शिंदे यांनी मार्गदर्शन केलेले आहे.

या राज्यस्तरीय यशस्वी कामगिरीबद्दल विजेत्या सर्व खेळाडूंचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सकपाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, उपकुलसचिव डॉ. परमिंदर कौर, क्रिडा विभागप्रमुख डॉ.दिनेश वंजारे, डॉ.शशिकांत सिंग, डॉ.श्रीनिवास मोतीयेळे व सर्व संबंधितांनी अभिनंदन करीत पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## खंडेलाधाम रथयात्रा शहरात दाखल! भाविकांनी केले स्वागत



तभा वृत्तसेवा

कन्नड दि.०७ डिसेंबर - शहरात खंडेला धाम राजस्थान येथून भारत भ्रमंती साठी निघालेली रथयात्रा

दि. ०६ रोजी रात्री उशिरा कन्नड शहरात दाखल झाली.

शहरातील सर्व खंडेलवाल समाज बांधवांनी रथयात्रेचे मोठ्या उत्साहात स्वागत करून दर्शन घेतले सदर रथयात्रा खंडेला धामाची जनजागृती भारतभर पसरलेल्या खंडेलवाल समाजात करण्यासाठी निघाली असून कन्नड, पिशोर, सिल्लोड मार्गे पुढे ही रथयात्रा छत्रपती संभाजीनगर सह संपूर्ण भारतभ्रमण करणार आहे यावेळी खंडेलवाल समाजाचे अध्यक्ष उमेश नाटानी (खंडेलवाल) स्वप्निल कुलवाल, कैलास खंडेलवाल, राहुल खंडेलवाल, मनोहर रामोरीया,हरी कुलवाल यांच्यासह महिला ,पुरुष व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेना भवन येथे संत जगनाडे महाराज व संत रविदास महाराज यांना अभिवादन



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.८, येथील शिवसेना नेते, आमदार अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे थोर संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंती निमित्त तसेच संत रविदास महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी संत संताजी जगनाडे महाराज तसेच संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. मच्छिंद्र पाखरे, मारुती वराडे, जगदीश बेदवे, शिवा टोम्पे, रवी गायकवाड, शेख सलीम हुसेन, गणेश शेलार, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद, मानसिंग राजपूत ,जितू आरके, कौतिकराव सोनवणे, गणेश टोम्पे, अभिजीत राऊत, नारायण पाटील ,डॉ. प्रकाश बिराडे, दत्ता एंडोले , विशाल प्रसाद, राजेश्वर आरके, धम्मा दांडगे , फहिम पठाण ,मोहन चंदनसे ,अमरसिंह राजपूत, बॉबी चौधरी ,महेश पाटील, विजय पंडित, महादू गुंजाळ, स्वप्नील शेळके, ज्ञानेश्वर जयस्वाल ,अजिनाथ साबळे, शेख रिजवान आदींची उपस्थिती होती.

## झाडे तोडून उभारला जातोय कारखाना; एमआयडीसीचे कारखानदारास अभय

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : एमआयडीसी परिसरातील प्लॉट क्र.एफ-८५ च्या प्लॉटधारकाने १५ ते १६ वर्षे जुन्या ८ झाडांची बेकायदेशीर कत्तल करून त्यावर कारखाना उभारला आहे, ही माहिती एमआयडीसीच्या अधिकार्यांना माहिती असूनही कारखाना मालकाच्या 'वजना'मुळे अधिकारी दुर्लक्ष करीत आहे.

एमआयडीसी परिसरातील प्लॉट क्र. ८५ च्या प्लॉट धारकाने १५ ते १६ वर्षे जुन्या ८ झाडांची बेकायदेशीर कत्तल करून त्यावर कारखाना बांधकाम सुरू केले आहे. याविषयी एमआयडीसीच्या अधिकार्यांनी कारवाईचे कागदी घोडे नाचवत हे काम बंद असल्याचे भासवले होते. परंतु हे काम सुरू ठेवण्यासाठी एफ-८५ च्या मालकाने चांगलेच 'वजन' वापरल्याने अद्याप त्या कारखानदारावर कोणतीच कारवाई झालेली नाही.

उलट बांधकाम जोरात सुरू आहे. त्यामुळे काही अधिकार्यांच्या मनमानी कारभारामुळे परिसरातील कामगार व नागरिकांच्या मनात एमआयडीसीबद्दलची विश्वासहर्ता कमी होत असल्याचे दिसून येत आहे. याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील का? असा प्रश्नही यानिमित्ताने विचारला जात आहे.